14 TO 20 MARCH 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 12/03/2022 9:57 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : १२ सोमवार दि. १४ मार्च २०२२ ते रविवार दि. २० मार्च २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पत्नीवरील संशयाने भयानक घडले बापानेच चिमुकलीला जिवंत गाडले

वाशीम/क्राईम रिपोर्टर

संशयाने पछाडलेला माणूस अक्षरशः मनोरुग्ण बनलेला असतो. त्याचा स्वतःवर ताबा राहत नाही. अशावेळी त्याला रक्ताच्या नात्याची सुद्धा ओळख राहत नाही. मग अशा माणसाच्या हातून काहीही घडू शकते. वाशीम जिल्ह्याच्या रीसोर्ड तालुक्यातील एका गावात पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या एका इसमाने चक्क आपल्या एक वर्षाच्या बालिकेला जिवंत गाडले. यात तिचा मृत्यू झाला असून पोलिसांनी बापाला अटक केली आहे. ...पान २ वर

## ना तारीख पे तारीख, ना न्यायासाठी मागितली भिक्षा अपहरणकर्त्या नराधमाला पाच दिवसात झाली शिक्षा

वसई/क्राईम रिपोर्टर




कधी कधी पोलीस जीवचं रान करून आरोपीला काही तासाच्या आत अटक करतात. पण अटक आरोपीला न्यायालयाकडून शिक्षा होण्यास विलंब लागतो. त्यामुळे जो पिडीत असतो त्याला न्याय मिळवण्यासाठी न्यायालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. मात्र वसई तालुक्यात एक अशी घटना घडली आहे ज्याने पोलीस आणि न्यायपालिकेबाबत लोकांच्या मनात आदर आणि विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नायगाव येथून एका सहा वर्षांच्या मुलीचे अपहरण करण्यात आले होते. मात्र पोलिसांनी अवघ्या २४ तासात आरोपीला पकडले आणि सर्वात महत्वाचे म्हणजे अत्यंत तातडीने या प्रकरणाची सुनावणी होऊन अवघ्या पाच दिवसात आरोपीला दोन वर्षांची शिक्षा ठोठावून न्यायालयाने हे प्रकरण निकाली काढले.

भारताची लोकशाही ज्या चार स्तंभावर उभी आहे त्यातील एक स्तंभ म्हणजे न्याय पालिका. पण आज न्यायपालिकेची अवस्था खूपच दयनीय आहे. एकीकडे कमजोर कायद्यांमुळे लोकांना न्याय मिळत नाही. कमजोर कायदे आणि त्यातील पळवाटांचा गुन्हेगारांना फायदा होतोय. त्यामुळे गुन्हेगारी वाढतेय, तर दुसरीकडे न्यायपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे संपुर्ण देशातील न्यायालयांमध्ये जवळपास ४ कोटी खटले प्रलंबित आहेत. ते कधी निकाली निघणार आणि त्या खटल्याशी संबंधित लोकांना कधी न्याय मिळणार याची काहीच शाश्वती नाही. अशा वेळेला जर एखाद्या गंभीर प्रकरणात आरोपीला आठ-दहा दिवसात शिक्षा झाली, तर त्यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. पण कधी कधी ज्या गोष्टी अपेक्षित नसतात त्याच घडत असतात आणि पुढे त्यातूनच परिवर्तनाचे मार्ग सापडतात. कारण न्यायालयात तारीख पे तारीख पडत असल्याने ज्यांचे अर्धे आयुष्य न्यायालयाच्या पायऱ्या झिजवण्यात गेले. त्यांच्यासाठी काही दिवसात लागलेला झटपट निकाल



हे एक मोठे आणि अविश्वसनीय आश्चर्याच म्हणावे लागेल. त्यामुळे झटपट निकाल लागला. यावर कोणाचा विश्वास बसणार नाही, पण अशी घटना वसई तालुक्यात घडली आहे.

वसई तालुक्यातील वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नायगावमध्ये ४ मार्च २०२२ रोजी रात्री ९.०० वाजण्याच्या सुमारास घरापासून काही अंतरावर खेळणाऱ्या एका ६ वर्षांच्या बालिकेचे अपहरण झाले होते. या प्रकरणी त्या मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून ५ मार्च २०२२ रोजी वालीव पोलीस ठाण्यात गु.र.क्रमांक २५३/२०२२ भादंविस कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशाने या गुन्ह्याच्या तपासासाठी ३ पथके तयार करण्यात आली आणि तपास सुरु झाला. सुरुवातीला जिथून मुलीचे अपहरण झाले, त्या भागातले सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता कंस सिंग नावाचा एक इसम मुलीला घेऊन जात असल्याचे दिसले. त्यानंतर रेल्वे स्टेशनचे फुटेज तपासले असता कंस सिंग त्या मुलीला मालाड येथे घेऊन गेल्याचे निष्पन झाले. त्यामुळे पोलीस मालाडमध्ये त्या मुलीचा आणि आरोपीचा शोध घेत असताना पोलीस आपल्या मागावर असल्याचे आरोपीच्या लक्षात येताच त्याने मुलीला मालाड येथे सोडून पोबारा केला. त्यानंतर त्या मुलीला एका महिलेने मालाड पोलीस ठाण्यात नेऊन सोडले आणि अशा तऱ्हेने अपहृत मुलगी सापडली, तर दुसरीकडे तिचे अपहरण करणारा ...पान २ वर

## बिंग फुटण्याच्या भितीने प्रेयसीचा खून केला फरारी प्रियकर बिहारमध्ये संशयास्पद मेला








वसई/क्राईम रिपोर्टर

प्रेम आंधळे असते हे खर आहे. पण सध्याचं जग हे बहुरुपियांचे आहे. म्हणूनच प्रेमात पडणाऱ्या प्रत्येक तरुण तरुणीने आपल्या मित्राची किंवा मैत्रिणीची पूर्ण माहिती घेतल्याशिवाय त्याला आयुष्यभराचा जोडीदार बनवण्याचा मनात विचारही आणू नये. कारण आजकालचे सुंदर आणि रुबाबदार व्यक्तिमत्व असलेले तरुण भोळ्या भाबड्या तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात, त्यांना मोठमोठी स्वप्न दाखवतात. तिचा विश्वास संपादन करण्यासाठी काल्पनिक श्रीमंतीचा भूलभुलय्या उभा करतात. पुढे लग्नाचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक आणि आर्थिक शोषण करतात. पण जेंव्हा त्यांचे खरे स्वरूप उघडकीस येते तेंव्हा खूप उशीर झालेला असतो.

वसईमध्ये राहणाऱ्या आणि मॅकेनिकल अभियंता असल्याची बतावणी करून सायली साहसाने नावाच्या तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढणारा सागर नाईक हा तरुण प्रत्यक्षात मॅकेनिकल अभियंता तर नव्हताच उलट मोबाईल गेमच्या आहारी जाऊन त्यालाच त्याने आपले विश्व बनवले होते. मात्र सायली लग्नासाठी त्याच्या मागे लागली होती. पण लग्न केल्यास आपले बिंग फुटेल म्हणून त्याने सायलीची हत्या केली आणि बिहारला पळून गेला आणि तिकडेच त्याचा संशयास्पद मृत्यू झाला. आता सागरने आत्महत्या केली कि त्याची हत्या झाली याचा पोलीस शोध घेत आहेत. सागर नाईक याचे वसईमध्ये राहणाऱ्या सायली बरोबर प्रेम होते. सायली स्वतः अभियंता आहे. पण सागर याने तिला आपणही मॅकेनिकल अभियंता असल्याचे सांगून तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर सायलीने त्याच्या मागे लग्नासाठी तगादा लावला म्हणून २०१९ मध्ये दोघांनी मंदिरात जाऊन लग्न केले. पण सायलीला मोठ्या धूम धडाक्यात सर्व कुटुंबियांच्या आणि आप्त इष्टांच्या साक्षीने लग्न करायचे होते. पण सागर कामाधंद्यालाच नव्हता. तो फक्त मोबाईल गेमच्या आहारी गेला होता. त्यामुळे काहीसा विशिप्त झाला होता. मोबाईल गेममध्ये अडकलेल्या माणसाचा कुटुंबाशी किंवा अन्य जवळच्या लोकांशी ...पान २ वर

## वैतागलेल्या सुनेने अचूक साधला नेम शेजाऱ्याच्या रिव्हॉल्व्हरने सासूचा केला गेम



यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

घर तिथे खटला असतो आणि कुटुंबात सासू सुनेचे कधीच पटत नाही. त्यामुळे दोघींमध्ये सतत कोणत्या न कोणत्या कारणावरून भांडणे होत असतात आणि कधी कधी हि भांडणे विकोपाला गेली तर हाणामाऱ्या सुद्धा होतात. अशीच एक घटना आर्णी येथे राहणारी सरोज हिचे सासू आशाबाई हिच्याशी अजिबात पटत नव्हते. त्यातून दोघींची सतत भांडणे व्हायची. याच भांडणाला कंटाळून सून सरोज हिने सासूच्या हत्येचा प्लान केला आणि शेजारी राहणाऱ्या निवृत्त जेलरचे रिव्हॉल्व्हर चोरून सासूची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सुनेला अटक केली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी या तालुक्याच्या ठिकाणी अरविंद पोरजवार यांचे कुटुंब राहण्यास आहे. अरविंद किसन पोरजवार यांचा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय आहे. त्याचे वडील किसन पोरजवार यांचे निधन झाल्यानंतर घरातील सर्व जबाबदारी ...पान २ वर

## माथेफिरू मजनूचे प्रेम आंधळे झाले एकतर्फी प्रेमातून तरुणीला ठार केले



आरोपी निखिल

सातारा/क्राईम रिपोर्टर



एकतर्फी प्रेम खूपच वाईत असते. कारण जेंव्हा अशा एकतर्फी प्रेमात समोरच्या मुलीकडून प्रतिसाद मिळत नाही तेंव्हा तिच्यावर प्रेम करणाऱ्या तरुणाच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग ती जर आपली होणार नसेल तर इतर कुणाचीही होणार नाही असे करायचे अशाप्रकारचे विचार त्या तरुणाच्या डोक्यात येतात आणि त्यातून तो काहीही करायला तयार होतो. सातारा जिल्ह्यातील पिंपोडे बिद्रूक येथे राहणारा निखील कुंभार हा सुद्धा गावातल्या एका मुलीवर एकतर्फी प्रेम करायचा पण ती त्याला अजिबात भाव देत नव्हती. त्यामुळे चिडलेल्या निखिलने तिच्या क्लासमध्ये जाऊन तिची हत्या केली आणि स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी निखीलवर गुन्हा दाखल केला आहे.

मजूनगिरी करणारे काही जण वरून शांत डोक्याचे जरी वाटत असले तरी ते आतून मानसिक विकृत्तीने ग्रासलेले असतात. आपल्यावर मुलीने प्रेम करावे, तिच्या प्रेमात आपण आकंठ डुंबुन जावे असे त्यांना वाटत असते निखिल कुंभार हा ही असाच होता. तो पिंपोडे बुद्रक येथे आपल्या आई वडिलासह राहयला आहे. वयाची २५ शी ओलाडली तरी अजून त्याचे लग्न ठरत नव्हते.काही ही काम धंदा न करता तो हिरोगीरी करत होता. आपल्या बाईकवरून गावात रपेट मारायची शायनींग करत मुलीच्यावर लाईन मारायचे एवढाच त्याचा उदयोग बनला होता. अशातच त्याचे गावातीलच एका अल्पवयीन मुलीवर प्रेम बसले होते. तो सारखा तिच्या मागे मागे करायचा. ती अल्पवयीन मुलगी त्याला काही जुमानत नव्हती. ...पान २ वर

## सुंदर भाईशी पंगा महागात पडला सिद्धार्थचा त्याने मुडदाच पडला



मुंबई/एस.कुमार

कोणताही भाई म्हटला कि एरियात त्याची चालती असते त्याच्या वाटेला कुणी जात नाही. अशावेळी जर कुणी त्याच्या मार्गात आडवा आला तर त्याचे दिवस भरले म्हणून समजा. माटुंगा लेबर कॅम्पमध्ये आपल्या आजीला भेटायला येणाऱ्या सिद्धार्थ आणि त्या भागातला भाई सुंदर याची ठसन होती. त्यातच सिद्धार्थने सुंदरच्या पत्नीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे सुंदरमधला भाई जागा झाला आणि त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने सिद्धार्थचा गेम केला. मात्र पोलिसांनी अवघ्या २४ तासात या गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक केली.

२४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री २.१५ वाजण्याचे पुर्वी माटुंगा रेल्वे स्टेशन ते सायन रेल्वे स्टेशन खांबा नं. १०/१५४ व १०/१५६चे मध्ये माटुंगा लेबर कॅप फुट ओव्हरब्रीजचे खाली डाऊन स्लो ट्रॅक नं १ येथे एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडली असल्याची ...पान ६ वर

## पूर्व वैमन्यस्यातून त्या दोघांचा घात झाला डाव साधून नऊ जणांना त्यांचा गेम केला



मयत



मयत

सांगली/क्राईम रिपोर्टर

आजकाल तरुणांमध्ये भाई गिरीची क्रेझ वाढत चालली आहे. त्यामुळे शाळा-कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तरुणांच्या हाती हत्यारे येऊ लागलीत आणि त्यातून टोळकी बनू लागलीत. या टोळक्यांना वेळीच आवरले जात नसल्याने त्यांच्या गुन्हेगारी टोळ्या बनू लागल्यात आणि या गुन्हेगारांमध्ये गँगवॉर होऊ लागले आहेत. शिवजयंतीच्या दिवशी स्टेजवर बसायला जागा दिली नाही. या शुल्लक कारणावरून दोन गटात खुन्नसबाजी आणि ठसन सुरु झाली आणि त्यात दोघांचा जीव गेला. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे.



सांगली जिल्ह्यातील जत हा दुष्काळग्रस्त तालुका येथील शेतकरी सदैव जगण्यासाठी काय करायचे याच्या चिंतेत असतात. कारण पाण्याअभावी शेतात फारसे पिकत नाही. त्यामुळे आर्थिक स्थिती हलाकीची. असे असताना मुले मात्र दादागिरी आणि गुन्हेगारीच्या मार्गावर शिवजयंतीच्या दिवशी झालेल्या कार्यक्रमात स्टेजवर बसायला जागा दिली नाही म्हणून दोन गटात भांडणे झाली. त्यानंतर एकमेकांना बघून घेण्याच्या धमक्या दिल्या जाऊ लागल्या आणि त्यातूनच संतोष माळी, मध गोंडा बगली आणि प्रकाश परगोंड यांच्यावर चाकू, सुरे, तलवारीने हल्ला करण्यात आला. यात संतोष माळी व मध गोंडा बगली यांचा मृत्यू झाला, तर प्रकाश परगोंड जखमी झाला. या प्रकरणी उमदी पोलीस ठाण्यात गु.र.क्रमांक ४९/२०२२ कलम ...पान २ वर



## अनैतिक संबंधातला काटा काढायचे ठरले प्रेयसीच्या पतीला प्रियकरानेच ठार मारले

बेळगाव/क्राईम रिपोर्टर



उफाड्याची जवानी आणि जवानीची आग बाईला वाईट मार्गाला नेते. अशात जर तिचा नवरा तिला कमी पडला, तर मग अशा बाईला रान मोकळे मिळते आणि आपली इच्छा तृप्त करण्यासाठी ती दुसऱ्या कुणाला तरी जवळ करते. बेळगावात राहणाऱ्या रजनीच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. पती सर्वच गोष्टीत कमी पडल्याने दोन मुलांची आई असतानाही तिने दुसऱ्याला जवळ केले. त्यामुळे तिचा पती तिला सोडून आपल्या दोन मुलांसह आपल्या मुळ गावी कोल्हापुरातील चंदगड येथे परतला. मात्र एके दिवशी रजनीच्या प्रियकराने त्याला पाहिले आणि आपल्या अनैतिक संबंधातला काटा कायमचा काढायचा असा विचार करून त्याला दारू प्यायला नेले आणि तिथेच त्याची गळा दाबून हत्या केली. मात्र पोलिसांनी या प्रकरणी आरोपींना अटक केली आहे.

कोल्हापूर बेळगाव ही दोन अंतरराज्य जिल्हे लागून असल्याने या भागातील लोकांचा रोटी बेटी व्यवहार हा होत असतो. कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील संतोष परीट हा आपल्या रोजी रोटीसाठी बेळगावात आपल्या पत्नीसह गेल्या पाच सहा वर्षापूर्वी आला.चंदगड तालुक्यातीलच पण सध्या बेळगावात राहत असलेल्या एका डॉक्टराच्या मदतीने संतोष याला ऐक ठिकाणी काम मिळाले होते.संतोष याची बायको (रजनी) काल्पनिक नांवही जरा चालूच होती. तिचा स्वभाव हा बाहेरख्याली होता. नवऱ्याच्या माघारी ती त्या कामासाठी सावज शोध होती. तशी ती ही अलिकडे मोलमजुरीसाठी कामाला जात असल्याने तिचा शोध लवकरच संपला होता. तिच्या कामावर असणाऱ्या कणबर्गी येथील परशराम कुरबुर याच्याशी तिची मैत्री झाली होती. रजनीच्या कमसीन जवानीकडे बघून परशराम हा जिभल्या चाटत होता. त्याला ही ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिच्या मागे लाळ घोळीत होता. तो तिला सारखे वहिनी वहिनी करीत होता. वहिनी वहिनी करून तो तिची मांडी दाबू इच्छित ...पान २ वर

## पान १ वरून....

### पत्नीवरील संशयाने भयानक घडले...

रीसोर्ड तालुक्यातील वाडी वाकद नावाच्या गावात सुरेश प्रभाकर घुगे हा इसम पत्नी व मुलीसह राहत असे. मात्र त्याचा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातून त्या दोघांची नेहमी भांडणे व्हायची. शुक्रवारी सुरेशने अशाच भांडणातून बेदम मारहाण केली. शेवटी ती जीव वाचवायला गावाकडे पळून गेली आणि तिने दिराला सांगितले. त्या नंतर दीर गावातील काही लोकांना घेऊन शेतातील गोठ्यावर आला. जिथे हे कुटुंब राहत होते. दरम्यान तिथे मुलगी कुठे दिसेना म्हणून तिथे आलेल्या लोकांनी मुलगी कुठे आहे असे सुरेशला विचारले असता ती माजी नसल्याने मी तिला गाडून टाकली असे उत्तर त्याने दिले. त्यामुळे सर्वांना धक्का बसला. त्यानंतर त्याने जिथे मुलीला गाडले ती जागा खोदली असता मुलीचा मृतदेह सापडला. या घटनेची माहिती नंतर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी सुरेशला अटक केली असून या घटने मुले संपूर्ण गाव हादरून गेला आहे.

### ना तारीख पे तारीख, ना न्यायासाठी ...

कंस सिंग मुंबई सोडून पश्चिम बंगालला जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती खबरीकडून पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी दादर, कुर्ला आणि बांद्रे स्थानकात आरोपीचा शोध सुरु केला आणि अखेर तो बांद्रा रेल्वे स्थानकात सापडला. अवघ्या २४ तासात पोलिसांनी त्याला पकडले. त्यानंतर त्याच्यावर ३६५ हे वाढीव कलम कळवण्यात आले. दरम्यान कंसा सिंग याला न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने त्याला ९ मार्च पर्यंत पोलीस कोठडी दिली होती. आरोपींच्या रिमांडच्या काळात तपास अधिकारी जयचंद ठाकूर, पोउनिरीक्षक सी.आर.पाटील यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे जवाब नोंदवले. सीसीटीव्ही फुटेज आरोपीचे निवेदन व पंचनामा इत्यादी ठोस सबळ पुरावे गोळा करून दोषारोप पत्रासह आरोपी कंस सिंग याला ९/३/२०२२ रोजी न्यायलयात हजर केले असता न्यायालयाने साक्षी पुरावे तपासून त्या आधारे भादंविस कलम ३६३ करिता आरोपीस २ वर्षांची शिक्षा आणि ५०० रुपये दंड तसेच कलम ३६५ करिता २ वर्ष शिक्षा व ५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

### बिंग फुटण्याच्या भितीने प्रेयसीचा ...

असलेला संवाद तुटतो. कारण तो एका वेगळ्याच दुनियेत वावरत असतो. त्याचे हे वास्तव सायलीपासून त्याने पद्धतशीरपणे लपवून ठेवले होते. पण तिने तर आपल्या पालकांना सांगून लग्नाची तयारी सुरु केली होती. अशावेळी लग्न झाले तर आपले बिंग फुटेल याची भीती असलेल्या सागरने सायलीला पापडी इथल्या स्टेटस लॉजमध्ये नेवून तिच्या डोक्यात लोखंडी वस्तूचा प्रहार करून तसेच उशीने तिचे तोंड आणि गळा दाबून तिची हत्या केली. त्यानंतर घरी गेला आणि आपली बॅग भरून एका लक्झरी बसने बिहार येथील मुझफ्फर नगर जिल्ह्यातील बेहरामपूर येथे गेला आणि तेथून तो नेपाळला पळण्याच्या तयारीत होता. दरम्यान पोलीस तपासात त्यानेच सायलीचा खून केल्याचे निष्पन्न होताच त्याचा शोध सुरु झाला. पण त्याने कॅलिफोर्निया येथील एका कंपनीचे पेड इंटरनेटा (व्हीपीएन) वापरात असल्याने त्याचे मोबाईल लोकेशन ट्रेस होत नव्हते आणि अखेर ज्या सागरला पोलीस शोधत होते त्याचा मृतदेह बिहार मधील एका हॉटेलच्या रूममध्ये संशयास्पद अवस्थेत सापडला. मात्र मृतदेहाजवळ कोणत्याही प्रकारची सुसाईड नोट सापडलेली नव्हती. मात्र त्याच्या नाकातून रक्त आले होते. त्यामुळे सागर याने आत्महत्या केली कि त्याची हत्या झाली याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

### वैतागलेल्या सुनेने अचूक साधला नेम...

अरविंद पार पाडत होता. अरविंदचे लग्न १२ वर्षापूर्वी सरोज नामक तरुणीशी झाले होते. सरोजपासून त्यांना दोन अपत्ये आहेत. यापैकी मोठी मुलगी अनुष्का ही १३ वर्षाची असून लहान मुलगा कृष्णा हा पाच वर्षाचा आहे. अरविंद हा आपल्या पत्नी, मुले तसेच वृद्ध आईसह येथे रहात होता. अरविंदला एक लहान भाऊ असून त्याचे नाव मंगेश आहे आणि तो अविवाहित आहे. मंगेश हा लॉजवर नोकरी करतो. सर्व कुटुंब एकत्र रहात होते. सारे सुरळीत चालले असतांना घरात कलहाची ठिणगी पडली. काही महिन्यापासून सासू-सून यांच्यात वाद सुरू झाले. कोणत्याही कारणावरून दोघींमध्ये वाद वाढू लागले. घरातील वातावरण पार बदलून गेले. सून आणि सासू यांच्या वर्चस्वाच्या लढाईन पोरजवार कुटुंबात पूर्णतः अस्वस्थता वाढली. दोघींमधील वाद एवढा विकोपाला जाईल याची कोणी कल्पनासुद्धा केली नव्हती.

सासू आशाबाई किसन पोरजवार हिचे टोमणे सहन न झाल्यामुळे सूनबाई सरोज अरविंद पोरजवार हिने कायदा हातात घेतला. सासूबाईचा गेम करण्याचा निर्धार तिने केला. सासूबाईला कसे संपवायचे याबाबत सरोजने प्लॅनिंग आखणे सुरू केले. मात्र सासूबाईचा जीव घेणे काही सोपी गोष्ट नाही हे तिला माहित होते. सरोजच्या घराशेजारी सेवानिवृत्त जेलर प्रभू गव्हाणकर यांचे घर आहे. सरोज, अरविंद, आशाबाई या तिघांचेही प्रभू गव्हाणकर यांच्या घरी जाणे-येणे होते. शेजारधर्म असल्यामुळे ते गव्हाणकर यांच्या घरांमध्ये कुठेही वावरत होते. सरोजच्या मनात सासूविषयी प्रचंड असंतोष खदखदत होता. गव्हाणकर यांच्याकडे रिव्हॉल्वर आहे याची माहिती सरोजला होती. म्हणून सरोजने गव्हाणकर यांच्या घरी पाळत ठेवून त्यांच्या रिव्हॉल्वरची दि. २१ जानेवारी रोजी चोरी केली. ही बाब गव्हाणकर यांच्या लक्षात आल्यानंतर एकच खळबळ उडाली. त्यांनी तातडीने आणी पोलीस स्टेशन गाठून या घटनेची माहिती दिली आणि पोलिसांनी अज्ञात आरोपींविरूद्ध रिव्हॉल्वर चोरीचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास सुरूच होता. मात्र आरोपीपर्यंत पोलीस पोहोचलेले नव्हते, कारण सरोजसारख्या सर्वसामान्य गृहिणीने रिव्हॉल्वर चोरली असावी असा संशयही कोणाला आला नाही. दरम्यान दि. २४ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता आशाबाई किसन पोरजवार यांचा पाय घसरून त्या गंभीर जखमी झाल्याची वार्ता पसरली. आशाबाईला तातडीने यवतमाळ येथील शासकीय रूग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. आशाबाईसोबत तिची सून सरोजहीसुद्धा गेली होती.

रूग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी आशाबाईची तपासणी केली आणि तिला मृत घोषित केले. आशाबाईचा जागीच मृत्यू झाला असा संशय आल्यामुळे दवाखाना चौकीतील पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी पाठवला. आशाबाई किसन पोरजवार (वय ६८) यांचे शवविच्छेदन सुरू असतांना त्यांच्या डोक्यामध्ये रिव्हॉल्वरची बुलेट निघाली आणि एकच खळबळ उडाली. सुरुवातीला आशाबाई पाय घसरून डोक्यावर पडल्याचे डॉक्टरांना सांगण्यात आले होते. मात्र त्यांच्या डोक्यामध्ये रिव्हॉल्वरची बुलेट आली कुठून? असा प्रश्न डॉक्टरांना पडला. शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांनी या घटनेची माहिती रूग्णालय पोलीस चौकीतील कर्मचाऱ्यांना दिली. रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी आणी पोलीस स्टेशनला ही माहिती कळवली. प्रभू गव्हाणकर यांच्या चोरीचा तपास सुरू असतांना त्यांच्या शेजारी राहणाऱ्या आशाबाईच्या डोक्यात रिव्हॉल्वरची बुलेट निघाल्यामुळे चोरीचा या घटनेशी संबंध असल्याचा संशय आणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार पितांबर जाधव यांना आला. त्यांनी तातडीने आशाबाईचे घर गाठले. आशाबाईचा मृतदेह शवविच्छेदन करून गावात येईपर्यंत पोलिसांनी त्यांच्या घराची झडती घेऊन रिव्हॉल्वर ताब्यात घेतली होती.

आशाबाईची सून सरोज हिने गव्हाणकर यांच्या घरातून रिव्हॉल्वर चोरली हे या घटनेनंतर स्पष्ट झाले. पोलिसांनी लगेच सरोजला ताब्यात घेतले आणि तिला महिला पोलीस कर्मचाऱ्यांकडून बोलते केले. तिने सर्व परिस्थिती पोलिसांसमोर कथन केली. सरोजने सांगितले की, माझी सासू मला नेहमी अपमानास्पद बोलते, माझा पानउतारा करते. गेल्या अनेक दिवसांपासून हा त्रास सहन करत आहे. आता अपमान सहन करण्यापलीकडे गेल्यामुळे सासूचा गेम करण्यासाठी मी प्रभू गव्हाणकरांच्या घरातून रिव्हॉल्वर चोरली आणि सासूबाई घरात पूजा करण्यात व्यस्त असतांना त्यांच्यावर गोळी झाडली. तत्पूर्वी रिव्हॉल्वरची गोळी कशी झाडायची? यासाठी मी स्वतः घरातील मातीच्या माठावर गोळी झाडून बघितली.

त्यामुळे आशाबाईवर सहज गोळी झाडता आली अशी कबुली तिने दिली. गोळी झाडल्यानंतर आवाज होणे अपेक्षित आहे, मात्र सरोजचे घर एका बाजूला असल्यामुळे या प्रकरणाचा सुरूवातीला गाजावाजा झाला नाही. सरोजचा पती अरविंद याला गोळीचा आवाज आला. मात्र त्याने हा विषय फार गांभीर्याने घेतला नाही. याचवेळी सासूबाई पाय घसरुन पडल्या आहेत अशी आरडाओरडा करत सरोज घराबाहेर आली आणि लोकांना गोळा केले. रक्तबंबाळ झालेल्या आशाबाई जागीच गतप्राण झाल्या होत्या. मात्र दवाखान्यात नेण्याचे नाटक करून सरोजने तिला तातडीने यवतमाळला हलवले आणि स्वतःही गेली. आपण केलेल्या गैरकायदेशीर कृत्याचा भांडाफोड होणार नाही अशी कल्पना सरोजने केली होती. मात्र तिची योजना पूर्णतः फसली. शवविच्छेदन अहवालाने मात्र सत्य उघडकीस आणले. एखाद्या सूनेने सासूविरुद्ध एवढे मोठे टोकाचे पाऊल उचलल्याची अलीकडच्या काळातील ही मोठी घटना आहे. सून सरोज पोरजवार हिला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर तिची पोलीस कोठडी घेण्यात आली. यावेळी तिने सर्व माहिती पोलिसांसमोर कथन केली. पोलिसांनी तिला खुनाच्या गुन्ह्यात तसेच प्रभू गव्हाणकर यांच्या रिव्हॉल्वर चोरी प्रकरणात अटक केली.

या प्रकरणामध्ये प्रभू गव्हाणकर हे महत्त्वपूर्ण साक्षीदार असून आरोपी महिला सरोज हिला खुनाच्या गुन्ह्यामध्ये शिक्षा होईल इतपत पुरावे पोलिसांकडे असल्याचा दावा पोलिसांनी केला. या प्रकरणाचा तपास करून तपास अधिकारी पितांबर जाधव व पोलीस कर्मचारी दिनेश यांनी पुरावे गोळा करत प्रकरण मजबूत केले. पोलीस अधीक्षक दिलीप पाटील-भुजबळ, अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी या खुनाच्या गुन्ह्याचा तपास केला. पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार, पोलीस उपनिरीक्षक जायले, पोलीस उपनिरीक्षक खंडारे, योगेश, मारूती मदने, मनोज चव्हाण, अमित झेंडेकर, मच्छवार यांनी तपासात सहकार्य केले.

### माथेफिरू मजनूचे प्रेम आंधळे...

तरी ही तो ती कॉलेजला जात असताना उगीचच तिच्या मागे मागे करायचा. माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू मला आवडतेस असे म्हणून तो मजनू गिरी करायचा. त्याच्या या प्रकराने त्या मुलीने त्याला एकदा दोनदा त्याला खडसावले ही होते. पण नकारतच होकार असतो असे मानून निखिल हा तिचा मार्ग सारखा अडवत होता. त्या बिचारीला आपले शिक्षण आणि करीयर महत्वाचे असल्याने ती त्याकडे लक्ष देत होती. त्यातच तिच्या घरीच परिस्थीती ही बेताचीच असल्याने नको त्या भानगडीत पडण्याची तिची मुलीच इच्छा नव्हती. निखिल मात्र तिच्यावर आपले प्रेम असून ती आपल्याला आवडते ती माझी आयटम आहे असे आपल्या मित्राना सांगितले होते. त्यामुळे त्या मुलीची गावात बदनामी झाली होती. निखिल आपल्या मागे लागतो त्रास देतो असे तिने आपल्या घरी आपल्या आई वडिलांना कधी सांगितले नाही याला कारण ही तसेच होते. कारण ही गोष्ट जर तिने घरी सांगितली असती तर तिच्या घरच्या लोकांनी तिचे कॉलेज बंद केले असते. बऱ्याचवेळेला मुलीची येथेच चुक होत असते. आपल्याला मुलापासून होणारा त्रास त्या घरी आई वडिलांना सांगत नसतात. त्यामुळे पुढे भविष्यात नको त्या गोष्टी घडतात. असेच त्या मुलीच्या बाबतीत ही घडले होते. तिला आपले शिक्षण पुर्ण करून वाणीज्य शाखेत करियर करायचे असल्याने ती कॉलजेला जात होती.त्यातच तिने अभ्यासासाठी गावात क्लास लावला होता. ती दररोज सकाळी ९.३० वाजता क्लासला जात होती. तर दुपार नंतर कॉलेजला जात होती. घर, क्लास आणि घरातील काम यातच तिचा सगळा दिवस निघून जात होता. त्यामुळे तिला प्रेम वैगरे यात काही इंटरेस्ट नव्हता.

निखिलने मात्र तिचा मोबाईल नंबर कुणीकडून तरी मिळविला होता. त्यानंबरवर तो सारखा तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होता. तिने आपल्याला रिस्पॉन्स दयावा, भेटावे, बोलावे असे त्याला वाटत होते. एकदा दोनदा वाटेत अडवून त्याने तिला आय लव्ह यू असे देखील म्हटले होते.पण तिच्याकडून त्याला काहीच रिस्पॉन्स मिळत नव्हता. तरी ही तो तिला सारखे तू हो म्हण. असे म्हणून त्रास देत होता. तिच्या मोबाईल व्हॉटॲपवर तो आय लव्ह यू चे मेसेज टाकत होता. ती आपल्याला रिस्पॉन्स देत नाही, म्हणून तो ही विकृत बनला होता. आपले तिच्यावर मनापासून प्रेम आहे तरी ही ती आपल्याला कानाडोळा करते आपल्याला टाळते याचा त्याला राग आलेला होता. काही ही करून तिला आपले बनवायचेच या इरादयाने तो वागत होता. त्याच्या मानत तिच्याबद्दल नको ते विचार येत होते. ती आपली जरी झाली नाही तरी तिला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायचे नाही असा खून्नशी विचार त्याने केला. खरे तर तिचे त्याचेवर प्रेम नव्हतेच. तो तिच्यावर एकतर्फी प्रेम करीत होता. यातच त्याला तिचे लग्न ठरले असल्याचे ही समजले होते. ती आपल्याशी लग्न करणार नाही दुसऱ्या कोणाच्या तरी गळयात वरमाला घालणार हा विचारच त्याला सहन होत नव्हता.त्याच्या नजरेसमोर डर चित्रपटातील विकृत पणे रंगविलेला शहारूख खान येत होता. आपण ही तसेच करायचे तिला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायचे नाही असा मनात त्याने पक्का विचार करून तो कामाला लागला. त्याची मानसिक अवस्थाच विकृत बनली होती.

नेहमीप्रमाणे ती रविवार ता.६ रोजी बस स्थानक परिसरातील पेट्रोल पंप परिसरात असणाऱ्या क्लासला सकाळी ९ वाजता आली. श्री राम किराणा दुकानाच्या वरच्या बाजूस तो क्लास होता. ती क्लास मध्ये आली त्यावेळी शिक्षक किंवा अजून कुणी आले नव्हते. ९.३०च्या दरम्यान क्लास सुरू होणार होता. अजून दहा पंधरा मिनिटात हळू हळू सगळे येतील असा तिने विचार करून ती क्लासमध्ये थांबली पुस्तके काढून ती वाचत असताना तिच्या समोर एकदम निखिल आला. तो क्लासमध्ये अचानक कसा काय आला याचा ती विचार करीत असताना त्याने तिला तू माझ्याशी का बोलत नाहीस, मला होकार का देत नाहीस असे विचारले. क्लासमध्ये कुणी नाही, तो तर समोर आला आहे, त्यामुळे ती ही घाबरली होती. तिच्या चेहऱ्यावर भिती दिसत असताना ती काहीच बोलत नव्हती. याच दरम्यान निखिलने तिच्याकडे रागाने बघत तू जर मला नकार दिलास तर मी तुला कोणाचीच होऊ देणार नाही म्हणत तिच्या पोटात आपल्याकडील चाकूने वार केला.तो चाकू त्याने तिच्या पोटात खुपसल्याने मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ती किंचाळत खाली पडली. काही समजण्याच्या आतच क्षणार्धात ही घटना घडली. तिला मारल्यावर तो भानावर आला. ती त्याचेसमोरच तडफडत विव्हळत पडली होती. त्याचवेळी त्याने आपल्या खिशातून विषारी द्रव्याची बाटली काढली आणि पिली. तो ही तेथेच तिच्या शेजारी खाली पडला. तिच्या किंचाळण्याने श्रीराम किराणा दुकानाचे मालक वरती आले. समोरचे ते दृश्य बबघून त्याना ही घाम फुटला. आरडाओरडा करून त्यांनी लोकांना जमविले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती. निखिलच्या तोडातून फेस येत होता. तर ती मुलगी बेशुध्द पडली होती. या ही परिस्थीत लोकांनी त्यादोघांच्यवा घरच्या लोकांना बोलावून घेवून तिला उपचारासाठी दवाखान्यात हलविले. मुलीला शेजारीच असलेल्या एका खाजगी दवाखान्यात नेले होते. तेथील डॉक्टरांनी तिची गंभीर अवस्था बघून तिला सातारा येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिले. तेथे तिच्यावर उपचार सुरू असताना दुपारी मृत्यू झाला. एकतर्फी प्रेमातून प्रियकराने प्रियेसीचा खून केल्याची बातमी सोशळ मिडियावर व्हायरल झाल्याने या प्रकारची चर्चा होऊ लागली होती. या घटनेची माहिती मिळताच कोरेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी मुलीची शाळेची बॅग व पुस्तके व रक्ताने माखलेला चाकू ही पडला होता. या प्रकाराने सर्वजण हादरले होते. पोलीसांनी पंचनामा करून सर्व वस्तु जप्त केल्या. या घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी गणेश किंद्रे व सपोनी संजय बोंबले यांनी भेट देवून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या होत्या. मयत मुलीचे शवविच्छेदन कोरेगाव ग्रामीण रुग्णायालत करण्यात आल्यानंतर तिचा मृतदेह तिच्या आई वडिलांच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर अंत्यत शोकाकूल वातावरणात तिच्यावर संध्याकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. इकडे विष प्राशन केलेल्या निखील कुंभारची परिस्थीती गंभीर बनली होती. त्याचेवर दुसऱ्यां दवाखान्यात उपचार सुरू होते. या घटनेची लेखी फिर्याद किराणा दुकानाचे मालक धनजंय लेंभे यांनी कोरेगाव पोलीसात दाखल केल्यानंतर निखिल राजेंद्र कुंभार (वय २६) याचे विरोधात अल्पवयीन मुलीच्या खून प्रकरणी भा.दं.वी. कलम ३०२ प्रामणे गुन्हा दाखल करण्यात आला. उपचारानंतर त्याला ताब्यात घेण्यात येईल असे पोलीसांनी सांगितले. या घटनेचा पुढील तपास कोरेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

### पूर्व वैमन्यस्यातून त्या दोघांचा घात...

३०२, ३०७, १४३, १४७, १४९, ५०६, आर्म ॲक्ट ४,२५ महाशस्त्र पोलीस अधिनियम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून हर्षवर्धन देशमुख (२०), संदीप भोसले (१९), संजय शिंदे (३१), अक्षय भिसे (२०), विकास भिसे (१९), इंद्रजीत वाघ (१९), विकास गुल्दागड (२४), तेजास्वीकुमार साळुंखे (३२), मारुती माळी यांना अटक करण्यात आली आहे. सांगलीचे पोलीस अधीक्षक दीक्षित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पंकज पवार उपनिरीक्षक संजय भारती, शिरीष शिंदे, लक्ष्मण खरात आणि त्यांचे सहकारी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### अनैतिक संबंधातला काटा काढायचे ...

असल्याचे तिने ही ओळखले होते. म्हणून ती ही त्याच्याशी लगट करीत भावोजी म्हणत त्याच्या जवळ जात होती. एकंदरीत आग दोन्हीकडून लागली असल्याने त्या दोघांना ही एकत्रीत यायला वेळ लागला नाही.

परशराम तिच्याशी गोड बोलत असताना तो तिची हर एक गरज पुर्ण करीत होता. दाणे टाकले तरच चिमणी गळाला लागते हे त्याला चांगलेच माहित होते. म्हणून तो तिला आपल्या अंगाखाली घेण्याच्या उद्देशाने ती मागेल ती वस्तु तिला देत होता. तो फक्त संधीच्या शोधात होता. म्हणून तो संतोष घरी नसताना ही तिला भेटायला येत होता. ती ही त्याला आपल्या नाजुक अवयवांचे दर्शन घडवित होती. त्याच्यासमोर आपले पाय फाकवून घेत त्याला आपल्या राणी ही दाखवित होती. संधी साधून एकदा परशरामने तिला आपल्या मिठीत घेवून तिच्या ओठांचे रसपान करीत दाबादाबी करत असताना ती ही घायतीला आली. ती त्याला विरोध केला नसल्याने त्याचे ही धाडव वाढले. त्यावेळी त्याने तिला सरळ बेडवर आडवी करत निर्वस्त्र केले.तो तिच्या नागडया गोऱ्यापान अंगावर पडून रोमान्स करीत असताना ती ही त्याला तशीच खालून साथ देत होती. तो तिच्यावर स्वार होऊन दणके मारत असताना तिला त्याचेकडून स्वर्ग सुख भेटत होते. याआधी तिच्या नवऱ्याने ही तिला असे कधी सुख दिले नसल्याने ती ही पुर्णपणे त्याच्या बाहुपाशात अडकली होती. त्याचा एक एक ठोका आवडत होता. तिच्या नवऱ्याची कमतरता त्याने भरून काढली होती.

त्यावेळेपासून त्या दोघांच्या संबधाला धार आली होती. त्या दोघांच्या त्या संबंधाची चर्चा होत असताना ही चर्चा रजनीचा नवरा संतोष याच्या कानावर देखील आली. याबाबत त्याने तिला विचारले असता ती उलट त्याचेबरोबर भांडण काढत तुम्ही लोकाच्या सांगण्यावर विश्वास ठेवता पण बायको वर विश्वास ठेवत नाही असे म्हणाली. तिचा भांडखोर स्वभाव तिला माहित असल्याने तो गप्प बसत होता. त्याच्या याच स्वभावाचा ती फायदा घेत परशरामबरोबर संबध वाढवित होती. एकदा संतोष कामावरून घरी दुपारी परत आला असता त्याला रजनी आणि परशराम हे दोघे ही नको त्या अवस्थेत दिसले. त्यावेळी त्याने आकांड तांडव करून घर डोक्यावर घेतले होते. पण त्याच्या या आरडा ओरडा करण्याला त्या दोघानी ही काडीची किमंत दिली नव्हती. उलट तिनेच त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत त्याला खरे खोटे सुनावले होते त्यावेळी परशरामने ही त्याला मारहाण केली होती. त्याचवेळी त्याने ओळखले की आपली पत्नी ही आपली राहिली नाही, ती परशरामची झाली आहे. भांडणात तो तिला शिव्या देत होता. पण ती काही त्याचे ऐकत नव्हती. तो तिला परशरामबरोबरचे संबंध तोडून टाक असे सांगत होता पण ती त्याला म्हणाली, एक वेळ मी तुम्हाला सोडेने पण परशरामला सोडणार नाही. आता तोच माझा नवरा आहे. रंगेहात सापडून ही नवऱ्याचे काही ऐकत नाही हे बघून संतोष याने मनाशी वेगळेच ठरविले होते. काही दिवस तो तसाच गप्प राहून बायकोचा बाहेरख्यालीपणा सहन करीत होता. परशराम तर त्याचेसमोरच रजनीला घेऊन मजा मारीत होता. या सगळ्या प्रकाराने संतोष पार वैतागलेला असायचा. रजनीचा बाहेरख्याली पणा त्याला सहन होईना म्हणून त्याने गेल्या पाच सहा महिन्यापूर्वी आपल्या मुलांना घेऊन सरळ चंदगड गाठले होते. रजनी ही परशराम बरोबर त्याच्या खोलीत राहू लागली होती. आता तर त्या दोघांना रान मोकळे झाले होते. ती त्याचेबरोबर खुशाल मजा मारत होती.तो तिची कमसीन जवानी ओरडबाडत होता. ती ही त्याचेवर आपली भरगच्च जवानी उधळत होती. नवरा भांडून आपल्या सोडून मुलांना घेऊन गावी गेल्याचा कांगावा ती करीत होती. पण प्रत्यक्षात मात्र ती परशरामबरोबर गुलछर्रे उडवित मजेत होती. त्या दोघांच्या संबंधात नवऱ्याचा किंवा इतर कोणाचा ही अडसर नव्हता.

संतोषच्या पदरी दोन मुले होती. त्याना आपल्या आईची आठवण येत असल्याने तो त्याना घेऊन रजनीला भेटायला एकदा दोनदा आला होता. त्यावेळी रजनी आणि परशराम यानी त्याला तू परत आमच्या येथे काही तरी कारण काढून येत जावू नकोस आमच्या संबंधाला अडथळा आणू नकोस असे म्हणून खडसावले होते. बायको हातची गेल्याचे बघून तो खजिल झाला. काही तरी करून तो तिला मोकळीक दे म्हणत होता. पण ती त्याला मोकळीक ही दयायला तयार नव्हती आणि परशरामबरोबरचे संबंध ही तोडायला तयार नव्हती. तिच्या दोन्ही कात्रीत नवरा या नात्याने तो सापडला होता. परशरामबरोबरच्या संबधाने तो पार वैतागलेला होता. तो जास्तच दारू पिवू लागला होता. मला सोड चिठ्ठी पाहिजे म्हणत तो दारू पिऊन येवूद रजनीच्या घरासमोर दंगा करीत होता. पण ती त्याला ताकास तूर लागू देत नव्हती. तो सारखा येवून भांडत असल्याने ते दोघे ही त्याचेवर चिडले होते. परशरामने तर त्याला ती तुझी लग्नाची बायको असली तरी ती माझी रखेल आहे तू उगाच आमच्या संबंधात मध्ये येवू नकोस नाही तर जीवाला मुकशील अशी धमकी दिली होती. संतोषला काय करावे काय नको असे झाले होते. बायको जेवू ही देईना आणि झोपू ही देईना अशी त्याची अवस्था झाली होती. तरी ही तो अधून मधून रजनीकडे येत होता.

मला मोकळीक दे म्हणत होता. बायकोला शेवटचेच विचारायचे म्हणून तो चंदगडहून बेळगावला दि.२८ फेब्रुवारी रोजी आला. बेळगावहून कणबर्गी येथे बस स्थानकावर तो आला असता तेथे त्याला परशराम याने बघितले. त्याला आडवत त्याच्याशी गोड बोलत चल तुला दारू पाजतो म्हणून आपल्या दुचाकीवर बसविले. बायकोचा यार आपल्याला दारू पाजतो म्हणून तो त्याचेबरोबर त्याचेगाडीवर बसून गेला. ते दोघे कणबर्गी गावातील यल्लाप्पा बुडुग याच्या शेतात आले. त्यावेळी संध्याकाळ होत आली होती. आजुबाजुला कुणी नव्हते. ते दोघे ही दारू पित बसले होते. परशरामने रजनीचा विषय काढून तू तिला त्रास देवू नकोस आणि आमच्या दोघाच्या मध्ये ही पडू नकोस असे सांगून तुझ्यापेक्षा भारी सुख मी तिला देतो म्हणून ती माझ्या नादाला लागली आहे. आपल्या बायको विषयी आपल्या समोरच तिचा यार अश्लिल बोलत आहे याचा राग संतोष याला आला. तो दारूच्या नशेत त्याला शिव्या देत तू मुद्दामच माझ्या बायकोला नादाला लावले आहेस. माझा संसार बराबाद केले आहेस असे म्हणत दारूच्या नशेत त्याला मारायला त्याचे अगांवर गेला. परशराम हा अंगाने धष्ट पुष्ट होता. त्याने त्याला मागे ढकलत आपल्या कडील टॉवेलने त्याचा गळा जोरात आवळून धरला.तो त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होता पण परशरामने आपली ताकद एवढी लावली की संतोष हा काहीच करू शकत नव्हता. तो गळा आवळत असताना मी तुझ्या बायकोबरोबर झोपतो तू आता वरती जावून झोप जा, असे म्हणत दात ओठ खात त्याचा गळा आणखीन जोरात आवळला. त्यासरशी संतोष हा निपचिप पडला. संतोषचे काम तमाम केल्याचे त्याने रजनीला फोन वरून सांगितले. त्यावेळी रजनीने त्याला त्याच्या मतृदेहाची विल्हेवाट लावण्यास सांगितले.

परशरामने थोडा वेळ विचार करून तेथेच गवताची गंजी पडलेली होती. त्या गंजीत त्याने संतोष याचा मृतदेह ढकलला आणि ती गवताची गंजी पेटवून दिली. गवताची गंजी पेटवल्यावर संतोष याचा मृतदेह जळून खाक झाला. त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यावर तो तेथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी यल्लाप्पा बुडुभ हे शेतकरी आपल्या शेतात आले असता त्याना गवताच्या गंजीत एका इसमाचा मृतदेह जळाल्याचे त्याला दिसले पस्थितीचे गांभीर्य ओळखून त्याने या घटनेची माहिती माळ मारूती पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. मृतदेह पुर्णपणे जळाला असल्याने ओळख पटविणे कठीण होते. म्हणून पोलीसांनी मयताचे फोटो सोशल मिडियावर टाकले. त्यानसार काही वेळातच मयताची ओळख संतोष परीट अशी पटली. मयताची ओळख पटल्यावर पोलीसांनी संतोष परीट याच्या पत्नीकडे त्याची चौकशी केली असता ती पोलीसाना उडवाउडवीची उत्तरे देवू लागली होती.

पोलीसांनी काही वेळात तिला महिला पोलीसाकरवी बोलते केले असता तिने आपणच आपला नवरा संतोष परीट याची गेम आपल्या प्रियकराकरवी केल्याचे सांगितले. या घटनेचा तपास करत असताना पोलीसांनी घटनास्थळाजवळील सीसीटीव्हीचे फुटेज ही तपासले होते. त्या फुटेज मध्ये रजनीचा प्रियकर परशराम हा संतोष याचा गळा आवळत असल्याचे दिसत होते. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने ही आपला गुन्हा कबुल करून आपले व रजनीचे विवाहबाहय संबंध मान्य केले होते. त्यासंबंधात तिच्या नवऱ्याचा अडसर ठरत असल्याने त्याचा आपण गेम केल्याचे सांगितले.

त्याने गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी मयत संतोष याच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून पोलीसांनी संतोष नारायण परीट (वय ३६) याच्या खून प्रकरणी रजनी व तिचा प्रियकर परशराम आण्णाप्पा कुरबुर (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याना मा. कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील माळमारूतीचे पो.निरी.सुनिल पाटील उप.निरी.होनाप्पातळवार प्रशिक्षणार्थी पो.निरी. श्रीशैल हुरगेरी हे करीत आहेत विवाहबाहय संबंधात पत्नी भरकटली की,ती कोणाचीच राहत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

14 TO 20 MARCH 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 12/03/2022 9:58 PM Page 1



# डोळ्यांची नियमित तपासणी हा काचबिंदूवर सर्वोत्तम उपाय -डॉ.हनुमंत कराड

**लातूर/प्रतिनिधी**

अनुवांशिकता, डोळ्याला मार लागणे, ४० च्या पुढील वय, मधुमेह, डोळ्यांत वाढलेला दाब या कारणांमुळे काचबिंदू होतो. काचबिंदूमुळे गेलेली नजर कुठल्याही उपचाराने परत आणता येत नाही. त्यामुळे नियमित डोळे तपासणी हा काचबिंदूवर सर्वोत्तम उपाय आहे. काचबिंदूचे वेळेत निदान व योग्य उपचार केल्यास काचबिंदूमुळे येणाऱ्या अंधत्वाला टाळता येते, असे मत एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक तथा नेत्र तज्ज्ञ डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केले. जागतिक काचबिंदू सप्ताहानिमीत्त एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा नेत्र तज्ज्ञ संघटना, महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालय, डी. एस. कराड आय इन्स्टिटयुट, लायन्स हेल्थ केअर कॅम्प्स, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ११ मार्च रोजी लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महात्मा गांधी चौक या मार्गावर जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. हनुमंत कराड बोलत होते. या वेळी जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. श्रीधर पाठक, जिल्हा नेत्र तज्ज्ञ संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. शिवाजीराव काळगे, शासकीय वैद्यकीय




महाविद्यालयातील नेत्र विभाग प्रमुख डॉ. उदय मोहिते, नेत्र तज्ज्ञ डॉ. नंदकुमार डोळे, डॉ. योगेश तोष्णीवाल, डॉ. मयुर कुलकर्णी, डॉ. अनिल स्वामी, डॉ. विश्वनाथ केंद्रे, लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रा. तानाजी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. काचबिंदू हा डोळ्यातील मागील नसेला होणारा आजार आहे. या आजारात डोळ्याच्या आतील दाब वाढून डोळ्याची मुख्य प्रकाश संवेदना वाहून नेणारी नस खराब होते.

काचबिंदूच्या प्राथमीक अवस्थेत रुग्णांला कोणताही त्रास होत नाही. सुरुवातीला डोळ्यामध्ये काचबिंदूची प्रक्रिया हळूवारपणे सुरु होते. मात्र हळू-हळू नजर कमी होत जाते, असे सांगून या वेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, काचबिंदूवर वेळेत उपचार न केल्यास अंधत्त्व देखील येवू शकते. काचबिंदू हा डोळ्यातील छुपा दुष्मण असून या आजाराचा विशेष त्रास नसल्याने बहुते रुग्णांना हा आजार झाल्याचे समजून येत नाही. काचबिंदूवर निदाना अभावी वेळेत उपचार न झाल्याने हळू-हळू दृष्टी कमी होऊन डोळा अंधत्तवाकडे वाटचाल करतो. काचबिंदूमुळे रुग्णांला विशेष त्रास होत नसला तरी वारंवार डोळे दुखणे, अजूबाजूची नजर कमी होणे, डोळा लाल होणे, पाणी येणे, ही लक्षणे या रोगाची कल्पना देत असतात. मधुमेही रुग्ण, वाढते वय, कुटूंबात काचबिंदू असणाऱ्यांना काचबिंदू होण्याची शक्यता जास्त असते. त्यासाठी नियमितपणे नेत्र तज्ज्ञांकडून डोळ्यांची तपासणी करुन घेणे अवश्यक आहे. जेणेकरुन वेळेत रोगाचे निदान होवून योग्य उपचार घेता येतील, असे डॉ. कराड म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. श्रीधर पाठक म्हणाले की, काचबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांमध्ये डोळ्यांतील दाब नियंत्रीत करुन काचबिंदूची वाढ थांबवता येते. नेत्र तज्ज्ञांच्या सल्लयाने ड्रॉप अथवा शस्त्रक्रिया करुन दाब नियंत्रित करता येतो. काचबिंदू झालेल्या रुग्णांनी आयुष्यभर नेत्र तज्ज्ञाच्या संपर्कात राहून नियमित उपचार घ्यावेत, असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैभवी चुरी यांनी केले तर आभार डॉ. हर्षल अंबाडे यांनी मानले. यावेळी लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महात्मा गांधी चौक या मार्गावर फेरी काढून काचबिंदू विषयी जागृती करण्यात आली.

या फेरीत एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्र विभाग, जिल्हा नेत्र तज्ज्ञ संघटना, महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालय, एमआयएनएस नर्सिंग महाविद्यालय, डी.एस.कराड आय इन्स्टिटयुट व लायन्स हेल्थ केअर कॅम्प्स, लातूर येथील नेत्र तज्ज्ञ, नेत्र चिकित्सक, पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## एसएससीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात



**अहमदपूर/प्रतिनिधी**

येथील शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या यशवंत विद्यालयाच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा देणाऱ्या एसएससीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने भावपूर्ण निरोप व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टागोर शिक्षण समितीचे सचिव तथा दलित मित्र डी.बी. लोहारे गुरुजी होते. विशेष अतिथी म्हणून कोठा पॅटर्न नांदेडचे संचालक प्रा. राजू सूर्यवंशी, लातूर नांदेड अराईजचे संचालक प्रा. अजय प्रताप सिंग तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक व्ही व्ही गंपले, उपप्राचार्य प्रा. बालाजी गोडभरले, उपमुख्याध्यापक रमाकांत कोंडलवाडे, पर्यवेक्षक उमाकांत नरडेले, दिलीप गुळवे, कोटाचे समन्वयक कयूम शेख, प्रा. रवी ईरफळे सह मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा. राजू सूर्यवंशी, प्रा. अजय राजसिंग, मुख्याध्यापक व्ही व्ही गंपले यांचे मार्गदर्शनपर भाषणे झाली. या समयी विद्यार्थ्यांच्या वतीने शिवपूजा दहिफळे, उत्कर्षा होनराव ही चे मनोगत पर भाषणे झाली तर प्रा. रवि ईरफळे आणि कपिल बिराजदार यांचे मार्गदर्शनपर भाषणे झाली. प्रास्ताविक रामलिंग तत्तापूरे यांनी सूत्रसंचालन राजकुमार पाटील यांनी तर आभार शरद करकनाळे यांनी मानले. या सोहळ्याचे औचित्य साधून दहावीच्या सराव परीक्षेतील ९० टक्के च्या पुढे टक्केवारी घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रंथ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत विद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुवर्ण पदक विजेत्या रुचिता विनेरकरचा पालिकेतर्फे सत्कार



**वसई/प्रतिनिधी**

इजिप्त येथील कायरो शहरात झालेल्या ISSF WORLD CUP मध्ये १० मिटर एअर पिस्तुल चॅम्पियनशिप (सांघिक स्पर्धा) मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालासोपारा येथे राहणारी कुमारी रुचिता विनेरकर हिने सुवर्ण पदक मिळवले त्याबद्दल माजी महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात. या कायर्कर्माला माजी महापौर नारायण मानकर, प्रविण शेट्टी, माजी उपमहापौर प्रकाश रॉड्रीग्ज, सहाय्यक आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस उपस्थीतीत होते.

प्रभाग कार्यालय 'एच' येथे सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना नारायण मानकर यांनी सांगितले कि, आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शना खाली पालिकेच्या माध्यमातून आम्ही कलाकार आणि खेळाडू यांना प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या दहा वर्षात अनेक योजना राबविल्या आहेत त्याच बरोबर येथील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा हि पुरविण्यात येत असल्याने अनेक खेळाडू आता जिल्हा, राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले कौशल्य दाखवत आहेत.

आज रुचिता हिने वसई विरारच्या नाव आपल्या कामगिरीने उंचावले आहे. तिला ऑलिम्पिक साठी संपूर्ण वसई विरारकरांकडून शुभेच्छा देत असताना त्या ठिकाणी हि तिने सुवर्ण पदक जिंकून यावे. आमी तिचा मोठा सत्कार करू. यावेळी रुचिता हिची शालेय वेळेची शूटिंग मधील मार्गदर्शक दर्शना जावळे हि सुद्धा उपस्थित होती.

## नेकनाळ येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा

**देवणी/प्रतिनिधी**




८ मार्च जागतिक महिला दिन या दिनानिमिताने प्रत्येक क्षेत्रातील खंबीर, कर्तुत्ववान, नेतृत्ववान महिलांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्तकरण्यासाठी असाच एक आगळा वेगळा सोहळा देवणी तालुक्यातील मौजे नेकनाळ येथे ग्रामसेवक ईश्वर मुर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्या आदेशान्वये संपूर्ण जिल्ह्यामध्ये ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मौजे नेकनाळ ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच कलावती उमाकांत कोरे यांच्या अध्यक्षतेखाली गावातील सार्वजनिक क्षेत्रामध्ये सामाजिक कार्य करणारे कार्यकर्त्ती आशा कार्यकर्त्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, महिला बचत गट कार्यकर्ती, जिल्हा परिषद शाळेतील महिला शिक्षिका, तसेच गावामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन याबद्दल जनजागृती करणारे सर्व महिला सामाजिक कार्यकर्ती यांचा महिला सरपंच कलावती कोरे यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ पुष्पहार देऊन महिला दिना निमित्त गौरव पूर्ण सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जल जीवन मिशन अंतर्गत शंभर टक्के गाव जलयुक्त झाले असून हर घर नळ से जल याप्रमाणे संपूर्ण कुटुंबांना दरडोई पाण्याची उपलब्धता करून देण्यात आली. तसेच घनकचरा व सांडपाण्याची व्यवस्थापनाबाबत या गावचे ग्रामसेवक ईश्वर मुर्के यांनी सविस्तर मार्गदर्शन केले शुद्ध पाणीपुरवठा घनकचरा व सांडपाणी या संदर्भात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असून जर महिलांनी पुढाकार घेतला तर आपला गाव समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही. तसेच आपल्या गावात घनकचरा व्यवस्थापनासाठी गांडूळ खत प्रकल्प उभारण्यात येणार असून सांडपाणी व्यवस्थापनासाठी बंदिस्त गटारी सार्वजनिक शोषखड्डे वैयक्तिक शोषखड्डे असे विविध उपक्रम या ठिकाणी राबविण्यात येणार आहेत. तरी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन ग्रामसेवक मुर्के यांनी केले. याप्रसंगी सरपंच यांनी वरील कामे लवकरात लवकर हाती घेऊन मार्गी लावण्यात येतील असे आश्वासित करण्यात आले व उपस्थित सर्व महिलांचे आभार मानण्यात आले.

## वाड्यातील कुडूस येथे बसवर दगडफेक; एक प्रवाशी जखमी

**वाडा/प्रतिनिधी**




अनेक दिवसांच्या संपानंतर काही कर्मचारी कामावर हजर झाल्याने वाडा आगारातील मोजक्याच बस चालू झाल्या आहेत. मात्र काही माथे फिरुंणा बस सेवा सुरू झाल्याचे रुचत नसावे याच भावनेतून वाडा आगाराची वाडा-ठाणे बस सकाळच्या सुमारास साडेआठ वाजता कुडूस येथे पोहचली असता कोणीतरी अज्ञात इसमाने बसच्या मागील खिडकिच्या काचेवर दोन दगड भिरकावले व तो पसार झाला. या दगडफेकिट एक प्रवाशी जखमी झाला त्याला तात्काळ कुडूस येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल केले. व बस मधील प्रवाशांना दुसऱ्या बस थांबवून या बसने पुढच्या प्रवासास पाठवले. दरम्यान दगडफेक करणाऱ्या माथेफिरू विरोधात कुडूस येथील पोलीस कार्यालयात तक्रार दाखल करण्यात असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## घरातील किंवा दुकानातील कचरा जाळणाऱ्यांवर आता पालिका करणार दंडात्मक आणि फौजदारी

**लातूर/प्रतिनिधी**

घर अथवा दुकानात जमा होणारा कचरा रस्त्याच्या कडेला जाळला जात असल्याचे निदर्शनास येत असून असा कचरा जाळणाऱ्यांवर महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे. दिनांक ११ मार्च २२ रोजी रोडवर कचरा जाणाऱ्या पाच लोकांवर महापालिकेमार्फत २५०० ची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे . यापुढेही असे प्रकार सुरूच राहिले तर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.नागरिकांनी कचरा घंटागाड्यांनाच द्यावा,असे आवाहनही उपायुक्त मंजुषा गुरमे यांनी केले आहे. शहरातील कचरा संकलित करण्यासाठी मनपाच्या वतीने घंटागाड्यांची सोय करण्यात आली आहे. असे असतानाही काही नागरिक आणि दुकानदार घर व दुकानातील कचरा एकत्रित करून रस्त्याच्या कडेला पेटवून देत आहेत. यामुळे प्रदूषणात भर पडत आहे.कचरा जाळू नये असे वारंवार आवाहन करूनही असे प्रकार थांबत नसल्याने मनपाने आता दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. यासाठी महापालिकेच्या स्वच्छता विभागाकडून विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, रवी कांबळे व महादेव फीस्के यांच्या नेतृत्वात ही पथके तयार करण्यात आली आहेत.

यापुढे शहराच्या कोणत्याही भागात कचरा जाळला जात असल्याचे निदर्शनास आले तर दंडात्मक कारवाई करून फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार आहे. शहरातील नागरिक व दुकानदारांनी अशी कारवाई टाळावी. आपले घर आणि दुकानात जमा होणारा कचरा घंटागाड्यांनाच द्यावा, असे आवाहन मनपाच्या वतीने केले आहे.

## पथनाट्याद्वारे लोककलावंतांनी केले यशस्वी सादरीकरण




**पालघर/प्रतिनिधी**

राज्य शासनाला दोनवर्षे पुर्ण झाल्या निमित्त शासकीय योजना जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी जिल्हा माहिती कार्यालय यांच्यामार्फत तिन संस्थांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात पथनाट्याद्वारे लोककलावंतांनी यशस्वी सादरीकरण करून जनतेमध्ये शासकीय योजना विषयी जनजागृती केली. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय यांच्या माध्यमातून जनजागृती कला मंच, सिद्धी विनायक संस्था, माय नाटक कंपनी या संस्थेने जिल्ह्यात लोककलेच्या माध्यमातून जनजागृती केली. लोक कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी जनजागृती कलामंच यांनी पालघर बेटेगाव, सफाळे, चावडे, पालघर आणि सिद्धी विनायक संस्था यांनी वाडा तालुक्यातील निघसे, खैरे, आंबिवली, तुसे तसेच माय नाटक कंपनी या लोककला पथकांनी वसई तालुक्यातील चंदनसार बाजार, मांडवी बाजार (ग्रामीण), वालीव बाजार येथे यशस्वीरीत्या पथनाट्याद्वारे शासकीय योजना, उपक्रम जनतेमध्ये सादर करून जनजागृती केली. कोव्हिड काळात दिलासा (शिवभोजन थाळी), सर्वांगिण विकास (रोजगार), निरंतर शिक्षण सुरू (शिक्षण), पालघर जिल्हा पोलिस सक्षम, वैद्यकिय क्षेत्रात पालघर जिल्ह्याची कामगिरी, इतर सर्व उपक्रम व योजनांची माहिती लोककलावंतांनी सादरीकरणाच्या माध्यमातून दिली.

## थोडक्यात वृत्तांत

### रुद्र स्पोर्टस् क्लबला जिम्नास्टीक स्पर्धेत यश

लातूर : जळगाव येथे महाराष्ट्र हौशी जिम्नास्टीक संघटने तर्फे २१ वी राज्य स्तरीय ऐरोबिक्स जिम्नास्टीक या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेत लातुर असोसिएशन संघातर्फे रुद्र स्पोर्टस् क्लब जिम्नास्टीक अकादमीच्या खेळाडूंनी भाग घेतला. यावेळी खुल्या गटात वैयक्तिक प्रकारात कु. सुषमा शिंदे ने रौप्य पदक पटकावले, दुहेरी प्रकारात कु. सुषमा शिंदे व योगेश पंडित यांना कांस्य पदक मिळवले. अदिती पाचपिंडे, माही जाधव, निशिता कलशेट्टी यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. संघाचे प्रशिक्षका आशा झुंजे भुसनुरे यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र हौशी जिम्नास्टीक संघटनेचे सचिव मकरंद जोशी, तांत्रिक तज्ञ समितीचे अध्यक्ष अदित्य जोशी. लातूर जिम्नास्टीक संघटनेचे अध्यक्ष संजय भुसनुरे, उपाअध्यक्ष ॲड. महादेव झुंजे पाटील, मोहन झुंजे पाटील, रुद्र स्पोर्टस् क्लबच्या संयोजक भीमाशंकर भुसनुरे व प्रियांका सागरे यांनी व समस्त पालकवर्गाने यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

### युवक काँग्रेस प्रदेश सचिवपदी ॲड.सुरज विभुते

लातूर : नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसच्या निवडणुकीत प्रदेश सचिवपदी ॲड.सुरज विभुते विजयी झालेले आहेत. ॲड.सुरज विभुते हे लातूर जिल्हा व सत्र न्यायालयात सध्या वकीली व्यवसाय करत असुन ते वयाच्या १८ व्या वर्षापासुन युवक कॉंग्रेसमध्ये सक्रीय आहेत. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची सुरवात ही युवक कॉंग्रेस चा मसला या गावच्या अध्यक्षपदापासुन झाली. गेली १० वर्षापेक्षा जास्त कालावधीत देशभरात विविध राज्यामध्ये जावून कॉंग्रेस पक्षाने दिलेल्या विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांना कसलाही राजकीय वारसा नसताना राहुल गांधी यांच्याा संकल्पनेमुळे त्यांना देशभरात काम करण्याची संधी मिळाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरातुन, नागरिकातून अभिनंदन होत आहे.



**देवणी येथे महावितरण उपविभागीय कार्यालयात नव्याने रुजु झालेले उपविभागीय अभियंता दासरी यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी देवणी तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष प्रा. अनिल इंगोले तसेच राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे महाराष्ट्र महासचिव प्राचार्य फकरोद्दीन बुदरे, महावितरण अभियंता निंबोणे सह उपस्थित होते. तसेच त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.**

### यशाला शॉर्ट कट नाही - डॉ सुनीता शिंदे

अहमदपूर : स्पर्श द इम्फाताटिक टच सेवाभावी संस्था अंतर्गत ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा केंद्र, अहमदपूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानि अकॅडमीच्या संचालिका दैवशाला इप्पर हे होत्या. तर प्रमुख वक्त्या डॉ. सुनीता शिंदे त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक महिला दिनाचे महत्व सांगून मुलींची व मुलांची काय जिम्मेदारी आहे यावर सांगत तुम्ही जर स्पर्धा करायचीच ठरवली आहे, तर मग स्वतःवर विश्वास ठेवा, मेहनती मध्ये सातत्य ठेवा, यशाला शॉट कट नसतो असे सांगितले. अकॅडमी मध्ये ढोल ताशाच्या गजरात व लेझीम खेळत उत्सहात मुलींनी हा आनंदाचा दिवस साजरा केला. एक दिवस अगोदर मुलींनी २३ किमी रनिंग करुन दाखवून दिले कि आम्ही पण मुलांपेक्षा कमी नाहीत. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांची कांबळे मॅडम व साक्षी ताटे तर आभार अर्चना करपे मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन गुट्टे, राम मेजर, जितेंद्र मेजर, उमाकांत कदम यांनी परिश्रम घेतले.

### शेडमध्ये बांधलेली गाय चोरली

लातूर : येथील सुळगल्लीतील खंडू किसनराव हुलगुंडे यांची शेडमध्ये बांधलेली गाय दि. ३ मार्च रोजी रात्री १.३० ते सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरांनी चोरुन नेली आहे. खंडू हुलंगुंडे यांच्याकडे पाच जनावरे आहेत. त्यांनी ती पाचही जनावरे आपल्या घराशेजारील शेडमध्ये बांधली होती. रात्री १.३० वाजता खंडू हुलगुंडे यांना जाग आली. त्यांनी जनावरांना वैरण टाकुन घरी झोपले. त्यानंतर म्हणजेच रात्री १.३० ते सकाळी ६ या वेळेत अज्ञात चोरांनी त्यांची ४० हजार रुपये किमतीची अडीच वर्षांची सहा महिन्यांची गाभन गाय चोरुन नेली आहे. याबाबत खंडू हुलगुंडे यांनी गांधी चौक पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल जीवन जाधव हे करीत आहेत.

### अनधिकृत शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये

मुंबई : मुंबई शहरातील पश्चिम विभागात काही संस्थानी शासनाची परवानगी न घेता अनधिकृत शाळा सुरु केल्या असल्याचे शिक्षण विभागास आढळून आले आहे. अशा शाळेत पालकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश देऊ नये असे आवाहन बृहन्मुंबई पश्चिम विभागाचे शिक्षक निरीक्षक नवनाथ वणवे यांनी केले आहे. बांद्रा ते दहिसर या भागात दि प्रागतिक एज्युकेशन सोसायटीचे मरोळ प्रागतिक हायस्कुल अंधेरी (पू.) (इंग्रजी), यंग इंडियन स्कूल, जोगेश्वरी (इंग्रजी), इत्तेमाद इंग्लिश हायस्कूल, गोरेगाव (इंग्रजी), जे के पब्लिक स्कूल, गोरेगाव (इंग्रजी), सरस्वती विद्यामंदिर हायस्कूल बोरिवली (हिंदी), सेंट मारिया इंग्लिश स्कूल, कांदिवली या एसएससी मंडळाच्या ५ ते १० वीचे वर्ग असलेल्या शाळा अनधिकृत असल्याचे शिक्षण विभागास आढळून आले आहे. या शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश देऊ नये. अन्यथा शैक्षणिक नुकसानीस ते स्वत: जबाबदार असतील, असेही शिक्षण निरीक्षक श्री वणवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

# आता तरी विरोधकांनी एकत्र यावे!

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि या निकालाने पुन्हा एकदा चार राज्यात भाजपला संधी मिळाली. अर्थात भाजपला मिळालेला विजय ही काही त्यांनी केलेल्या कामकाजाला जनतेने दिलेली पोहचपावती नाही, तर विरोधकांमध्ये असलेल्या फाटा फुटीचा भाजपला लाभ झाला आहे. जर विरोधी पक्ष एकसंघ असता तर एकही राज्यात भाजपची सत्ता आली नसती. भाजपच्या समोर विरोधकांची काहीच ताकत नाही असे नाही विरोधकांची सुद्धा ताकत आहे. आणि मागील वेळेस पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींनी ती दाखवून दिली होती, त्यानंतर या निवडणुकीत पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने भाजपची प्रादेशिक पक्षापेक्षा सुद्धा वाईट अवस्था करून टाकली. पंजाबमध्ये भाजपला अवघ्या २ जागा मिळाल्या. केजरीवाल यांनी तीन वेळा मोदींना झुकवले. दोन वेळा दिल्लीची सत्ता काबीज करून भाजपला धूळ चारली, तर तिसऱ्या वेळा पंजाबमध्ये भाजपचा नामोनिशाण मिटवून टाकला. याचा अर्थ विरोधी पक्षात ताकत आहे. उत्तर प्रदेशमध्ये भाजपला भलेही बहुमत मिळाले असेल, पण प्रचारात भरपूर खर्च करून मोदींनी इतक्या सभा घेऊन सुद्धा भाजपचे नुकसानच झाले. मागील वेळेस भाजपला ३२५ जागा मिळाल्या होत्या. यावेळी २७३ मिळाल्या, म्हणजेच ५३ जागांचे नुकसान झाले. याउलट मागील वेळी समाजवादी पक्षाने ४७ जागा मिळवल्या होत्या. यावेळी त्यांना १२५ जागा मिळाल्या म्हणजेच त्यांना ७७ जागा अधिक मिळाल्या याचा अर्थ युपीमध्ये भाजप पेक्षा समाजवादी पक्षाचेच यश अधिक आहे. जर सगळे विरोधक एकत्र आले असते, तर युपीमध्ये नक्कीच सत्तांतर झाले असते. उत्तराखंड, गोवा आणि मणिपूरमध्ये भाजपने मुसंडी मारली आहे. तिथेही विरोधी पक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे देशातील जनतेच्या मनात विरोधी पक्षाबाबत नेमकी कोणती भावना आहे तेच या निकालाच्या वरून दिसतेय. मोदींनी काही चुकीचे निर्णय घेतले जे जनतेला पटले नाहीत, तरी सुद्धा लोक मोदींवर आणि भाजपा वरच का विश्वास दाखवत आहेत याचा विरोधकांनी विचार करायला हवा. गोव्यात काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांना इतका गर्व झाला होत की, आम्ही स्वबळावर निवडणुका सहज जिंकू असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी कुणाशी युती केली नाही. आत्ता त्यांना आपल्या चुकलेल्या निर्णयाचे परिणाम भोगावे लागत आहेत. विरोधकांचे आप आपसातले मतभेद हाच भाजपचा प्लस पॉइंट आहे. त्यामुळे २०२४च्या निवडणुकीत सुद्धा विरोधकांचे काही खरे नाही. कारण एकमेकांच्या पायात पाय अडकवणाऱ्या विरोधकांवर देशातील जनतेचा विश्वासाचं राहिलेला नाही. त्यामुळे या अठरापगड चिंधी चोरांपेक्षा मोदी बरे असेच लोकांना वाटत आहे. त्यामुळेच लोक मोदींच्या बाजूने जात आहेत, पण मोदी आणि त्यांच्या पक्षाला हरवणे कठीण नाही हे केजरीवाल यांनी दोन वेळा दाखवून दिले आणि आता स्वबळावर पंजाब जिंकला याला म्हणतात निर्धार! तसे पाहता लोकांना आता राजकारणात फारसा इंटरेस्ट राहिलेला नाही. कारण निवडून दिलेल्या लोकांना जनतेच्या प्रहणापेक्षा शूद्र स्वार्थी राजकारण करण्यात अधिक रस आहे म्हणून तर विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना सभागृहात लोकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यापेक्षा बाहेर आंदोलने केली जात आहे, याला जबाबदार विरोधी पक्ष म्हणायचे का? त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक दोघेही सारखेच आहेत. त्यामुळे जनतेच्या नजरेत दोघांनाही कवडीची किंमत राहिलेली नाही. लोक नाईलाजाने मतदान करतात, पण लोकांच्या दृष्टीने या देशातील लोकशाही कधीच संपली आहे.

# ईडी नेमके काय करते?

**महाराष्ट्रातील अनेक राजकीय नेत्यांवर ईडीची चौकशी झाली, त्यावरुन राजकारण पेटल्याचे संपूर्ण देशाने पाहिले आहे. परंतु, ईडीची चौकशी म्हणजे ईडी ही कोणती संस्था? काय भानगड आहे ईडी म्हणजे हे आपण या लेखातून जाणून घेऊया.**




महाराष्ट्रातले महाविकास आघाडी सरकारचे नेते सातत्याने केंद्र सरकारवर शासकीय संस्थांचा गैरवापर तसेच संस्थांवर दबाव टाकत असल्याचे आरोप करत आहेत. शासकीय संस्था म्हणजे नेत्यांचा रोख विशेषत: ईडी या संस्थेवर आहे.

### ईडी म्हणजे?

ईडी म्हणजे इन्फोर्समेंट डिरेक्टोरेट होय. ज्यास मराठीत अंमलबजावणी संचालनालय असे म्हणतात. महसूल विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत एक विशेष आर्थिक तपास संस्था आहे. अंमलबजावणी संचालनालय आर्थिक बाबींवर नियंत्रण आणण्यासाठी विशेषतः स्थापन करण्यात आले आहे.

अंमलबजावणी संचालनालयाची स्थापना १ मे १९५६ रोजी करण्यात आली होती. भारतात आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. ही देशात आर्थिक कायद्याचं व्यवस्थापन करणारी संस्था आहे. १९४७ च्या कायद्याअंतर्गत ईडीची स्थापना करण्यात आली होती. १९५६ ला स्थापनेच्या वेळी ईडीला ईयू (एनफोर्समेंट यूनिट) म्हणून ओळखले जात होते, पण १९५७ ला त्याचे नाव बदलून ईडी (एनफोर्समेंट डायरेक्टरेट) असे करण्यात आले. ही एक इकोनॉमिक्स इंटेलिजन्स संस्था आहे. देशातील हवाला, मनी लाँड्रिंग, भ्रष्टाचार यांसारख्या गोष्टींवर ईडी नजर ठेवते.

### ईडीची पार्श्वभूमी

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ (फेमा) आणि संपत्ती निवारण अधिनियम २००२ (पीएमएलए) या दोन कायद्यांचे पालन ईडीमार्फत केले जाते. ही संस्था कर्मचाऱ्यांच्या थेट भरतीशिवाय सीमा-शुल्क, केंद्रीय उत्पादनशुल्क, प्राप्तीकर, पोलीस अशा विविध विभागांतील अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीच्या आधारे त्याठिकाणी घेतले जाते. ११ मार्च २०११ रोजी मागणीनंतर संचालनालयाने अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या ७५८ वरून वाढवून २०६७ करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. संचालनालयाने विभातील आपल्या २२ कार्यालयांची संख्या ४९ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच ४९ कार्यालय कार्यरत होतील, अशी माहिती ईडीने आपल्या वेबसाईटवर दिली आहे. सध्या संजयकुमार मिश्रा अंमलबजावणी संचालक म्हणून काम पाहत आहेत. सर्वप्रथम फेरा १९४७ च्या कायद्यानुसार ईडीची स्थापना झाली. त्यानंतर या कायद्यात बदल करून फेरा १९७३ आला. आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे फेरा १९७३ च्या नियामक कायद्यात थोडाफार बदल करण्यात आला. त्याच्या जागी १

## दिशायन

जून २००० ला फेमा १९९९ हा कायदा लागू करण्यात आला. त्यानंतर विदेशी संपत्ती नियमन कायदा (पीएमएलए २००२) हा नवा कायदा लागू करून अंमलबजावणी संचालनालयाकडे त्याची जबाबदारी देण्यात आली.

### ईडीमार्फत होणारी कारवाई

सध्या ईडी दोन कायद्यांसाठी काम पाहते. पहिला कायदा म्हणजे विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ (फेमा), या कायद्यानुसार दिवाणी प्रकरण याअंतर्गत येतात. यातील प्रकरणांची चौकशी ईडीमधील संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. गुन्हा सिद्ध झाल्यास थकीत रकमेच्या तीन पटीपर्यंत दंड लावला जाऊ शकतो. तर दुसरा कायदा पीएमएलए हा एक फौजदारी गुन्ह्याबाबतचा कायदा आहे. याअंतर्गत तपास इतर गुन्हेगारी प्रकरणांनुसारच करण्यात येतो. यातील २८ कायद्यांच्या १५६ कलमांनुसार कारवाई करण्यात येते. यात संपत्ती जप्त करणे, हस्तांतरण, रुपांतरण आणि विक्री यांच्यावर बंदी घालणे, अशी कारवाई केली जाऊ शकते.

### ईडीचे अधिकार

ईडीफॉरेन एक्स्चेंज रेग्युलेशन ॲक्ट, १९७३ अंतर्गत काम करते, हा कायदा फेरा म्हणून ओळखला जात असे. फेमा १ जून २००० रोजी लागू करण्यात आला. काही काळानंतर फेमाशी संबंधित सर्व बाबी ईडीच्या अखत्यारीत आणल्या गेल्या. सध्या, ईडी एफईआरए १९७३ आणि एफईएमए १९९९ अंतर्गत कारवाई करते. ईडीला फेमा, १९९९च्या उल्लंघनाशी संबंधित माहिती केंद्रीय आणि राज्य माहिती एजन्सींकडून, तक्रारी इत्यादी प्राप्त होते. ईडी हवाला परकीय चलन रॅकेटीरिंग, निर्यात प्रक्रिया पूर्ण न करणे, परकीय चलन परत न करणे आणि फेमा, १. अंतर्गत उल्लंघन यांचे तपास आणि निर्णय घेते.

न्यायालयीन निर्णय कार्यवाही अंतर्गत दंड वसूल करतो, यासाठी तो लिलाव इत्यादी प्रक्रियेचे अनुसरण करतो. हे सर्वेक्षण, तपास, जप्ती, अटक, पीएमएलए गुन्ह्यातील गुन्हेगाराविरुद्ध खटला चालवते. जप्त करणे, जोडणे, तसेच पीएमएलए अंतर्गत गुन्हेगाराचे हस्तांतरण यासंदर्भात करार करणाऱ्या राज्याला किंवा त्याच्याकडून परस्पर कायदेशीर सहाय्य शोधते आणि प्रदान करते. प्रामुख्याने फेमा उल्लेखांनुसार दोषी आढळलेल्यांची मालमत्ता ईडी जप्त करू शकते.



# मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या भविष्यकालीन योजनांसाठी लेखी सूचना पाठविण्याचे सारथीचे आवाहन

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी (लक्षित गट) या समाजातील महिला, विद्यार्थी, तरुण, शेतकरी या विविध घटकांच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने सारथी संस्थेने सन २०३० पर्यंत कोणकोणते उपक्रम प्राधान्याने राबविले पाहिजेत, याबाबत राज्यातून सूचना मागविण्यात येत आहेत. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेचा प्रस्तावित भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document) - २०३० हा सर्वसमावेशक व व्यापक होण्यासाठी, सारथी संस्थेने सन २०३० पर्यंत कोणकोणते उपक्रम प्राधान्याने राबविले पाहिजेत याबाबत ३१ मार्च २०२२ पर्यंत सूचना लेखी स्वरुपात पाठवाव्यात असे आवाहन सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी केले आहे. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या समाजातील बहुसंख्य लोक हे शेतीवर अवलंबून आहेत. यास्तव या घटकांचे शेतीवरील अवलंबित्व कमी करुन त्यांना विविध क्षेत्रातील रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी उपाययोजना करणे, शेतकरी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न वाढविणे, शेतकऱ्यांचा तसेच महिलांचा ताणतणाव क्लेश (Distress) कमी करण्यासाठी उपाययोजना करणे यासाठी या गटातील समाज हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या प्रगत होण्यासाठी सुनियोजित उपाययोजना कालबद्ध पद्धतीने करण्याचा सारथी संस्थेचा मानस आहे. राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था दि. १९ फेब्रुवारी, २०१९ पासून कार्यरत आहे. सारथी संस्थेच्या उद्दिष्टांची कालबद्ध पूर्तता होण्यासाठी संस्थेचा भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document) २०३० तयार करणेबाबतचा उपक्रम सारथी संस्थेने हाती घेतला आहे. यात नाविन्यपूर्ण व कल्पक योजनांचा समावेश करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, विचारवंत यांचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. सारथी संस्थेमार्फत या समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. एम. फील व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी नोंदणीकृत विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती, संघ लोकसेवा आयोग व राज्यसेवा आयोग पूर्व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क, विद्यावेतन व पूर्व परीक्षा तसेच मुख्य परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एकरकमी आर्थिक साहाय्य हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे फलित म्हणून संघ लोकसेवा आयोगाच्या २०१९ च्या नागरी सेवा परीक्षेमध्ये सारथी संस्थेने अर्थसाहाय्य व मार्गदर्शन केलेल्या २२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली आहे. त्यात ५ विद्यार्थी हे भारतीय प्रशासकीय सेवा (IS). ०८ विद्यार्थी हे भारतीय पोलीस सेवा (IPS) व ३ विद्यार्थ्यांची भारतीय महसूल सेवा (IRS) यामध्ये निवड झाली आहे. नवीन राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये या समाजघटकातील विद्यार्थ्यांचा प्रशासकीय सेवेत सहभाग वाढविण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग, तरुणांना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने कौशल्यवृध्दी व कृषी प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण, प्रज्ञावान शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, महिला सक्षमीकरणाकरिता नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्याचा मानस आहे. सारथी संस्थेच्या स्थापनेबाबतचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत काढलेल्या दि. ०४ जून, २०१८ या शासन निर्णयात संस्थेच्या उद्दीष्टांचा समावेश करण्यात आला आहे.तरी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीनुरूप या समाज गटातील महिला, विद्यार्थी, तरुण, शेतकरी, जेष्ठ नागरिक इत्यादी विविध घटकांच्या सक्षमीकरणाच्या अनुषंगाने संस्थेने भविष्यात सन २०३० पर्यंत कोणकोणते उपयुक्त उपक्रम प्राधान्याने राबविले पाहिजेत, याबाबत आपल्या सूचना संस्थेस ईमेल आयडी sarthipunegmail.com तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, बालचित्रवाणी इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड,पुणे महाराष्ट्र-४११००४ येथे लिखित स्वरुपात पाठवाव्यात, तसेच अधिक माहितीसाठी https://sarthi-maharashtragov.in असे संकेतस्थळ आहे. तरी या उपक्रमातील सर्वांच्या सूचना व सहभागामुळे संस्थेचा प्रस्तावित भविष्यकालीन योजनांचा आराखडा (Vision Document) २०३० सर्व समावेशक व व्यापक स्वरूपाचा होऊन, राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजाची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल असे आवाहन सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

# लातूर जिल्ह्यातील ६० शेतकऱ्यांसाठी २२ ते २६ मार्च प्रशिक्षण सहलीचे आयोजन!

**लातूर/प्रतिनिधी**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२१-२२ मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत लातूर कृषि उपविभागातील लातूर-१४, औसा-१८, निलंगा-१३, रेणापूर-१०, आणि शिरुर अनंतपाळ-५ असे एकुण ६० शेतकऱ्यांसाठी प्रक्षेत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवावयाचा आहे. सदर प्रशिक्षण सहल दि. २२ ते २६ मार्च २०२२ या कालावधी मध्ये असून प्रशिक्षण सहलीमध्ये सोलापुर, बारामती, राजगुरुनगर, आळंदी, मोशी पुणे, तळेगाव दाभाडे, बाभळेश्र्वर, शिर्डी, राहूरी कृषि विद्यापीठ या ठिकाणी असलेल्या संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतीस भेट, किसान प्रदर्शन इ. स्थळांना भेटीचे नियोजन असल्याचे उपभिागीय कृषि अधिकारी, लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. तरी फलोत्पादन विषयक घटक राबविलेले तसेच राबविण्यास इच्छूक असलेल्या २५ ते ५० वर्षे वयोगटातील किमान १० वी उत्तीर्ण असलेल्या प्रगतशिल शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात दि. १० मार्च २०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करुन पोंच घ्यावी.

अर्जासोबत सातबारा, दहावीची सनद, आधार कार्ड, कोविडच्या दोन्ही लस घेतल्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक राहिल. अनु.जाती / अनु. जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना प्राधान्य राहील. त्याबाबत जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अवश्यक राहील. तालुका निहाय लक्षांकां प्रमाणे कमी अर्ज आल्यास तालुक्या अंतर्गत लक्षांक कमी जास्त करण्यात येईल. लक्षांकाप्रमाणे जास्त अर्ज आलेल्या तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची निवड सोडत (लॉटरी) पध्दतीने करण्यात येईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी लोकसहभाग म्हणून प्रत्येकी रु. ८०० रु. रक्कमेचा धनाकर्षक (डी.डी.) निवड यादी लागल्यापासून दोन दिवसत संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात जमा करावा. प्रशिक्षण कालावधी मध्ये भोजन, नाष्टा व निवासाची सोय करण्यात येईल. सदर प्रशिक्षण सहलीच्या आयोजनाबाबत कोणताही बदल करण्याचे अधिकार उपभिागीय कृषि अधिकारी, लातूर यांचेकडे अबाधित राहतील. या प्रशिक्षण सहलीसाठी उपविभागस्तरावर समन्वयक अधिकारी म्हणुन तंत्र अधिकारी एम.एस. क्षिरसागर मो.क्र. ८६६८२७७२४० यांची नियूक्ती करण्यात आलेली असून सहलीबाबत इतर माहितीसाठी त्यांचेशी संकर्प साधावा असे आवाहन उपविभागीय कृषि अधिकारी आर.एस.कदम यांनी केले आहे.

# कोकण विभागात लोककलाद्वारे प्रसिध्दी नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोंकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी या जिल्हयांमध्ये शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे लोककलांच्या माध्यमातून जनजागृती करण्यास आज पासून प्रारंभ झाला आहे. महाविकास आघाडी सरकारला यशस्वी दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या शासनाने विविध क्षेत्रांसाठी नवनवीन योजना राबविल्या. गेल्या दोन वर्षात महाविकास आघाडी सरकारने स्वीकारलेली धोरणे, घेतलेले निर्णय, केलेल्या कार्याची माहिती कोंकणाच्या कानाकोपऱ्यात पोहचावी यासाठी लोककला या प्रभावी माध्यमाव्दारे शासकीय योजना व विकास कामांच्या प्रचार व प्रसिध्दीची मोहिम संपूर्ण राज्यभर दि. ९ ते १७ मार्च या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या प्रसिध्दी मोहिमेचा आज पासून शुभारंभ झाला. कोकण विभागाच्या जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत विविध लोककला व पथनाट्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रमुख गावांमध्ये जनजागृती अभियान दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची या टॅगलाईनसह सुरु आहे. आज ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने ठाणे जिल्हयातील खारेगाव, माजिवाडा, बाळकुंभ आणि येऊर तसेच शहापूर तालुक्यातील वाशिंद आणि कल्याण येथील तहसिल कार्यालये, बाजारपेठा आणि वर्दळीच्या ठिकाणी माहिती व जनसंपर्क महासंचालयाच्या वतीने ठाणे जिल्हयासाठी निवडण्यात आलेल्या कलापथक व लोककलामंचांनी कार्यक्रमांचे सादरी करण केले. रायगड जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने रायगड जिल्हयातील म्हसळा, खरसई अलिबाग आणि नागडोंगरी येथील तहसीलदार कार्यालय, बसस्थानक, अलिबाग समुद्रकिनारा, बाजारपेठा आणि वर्दळीच्या ठिकाणी रायगड जिल्हयासाठी निवडण्यात आलेल्या कलापथक व लोककलामंचांनी कार्यक्रमांचे सादरीकरण केले. रत्नागिरी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने रत्नागिरी जिल्हयातील खेड पंचायत समिती कार्यालय, वावे तर्फे नातू, नाणिज, हातखांब, नाटे आणि धाऊलवल्ली बाजारपेठ, बसस्थानक आणि वर्दळीच्या ठिकाणी रत्नागिरी जिल्हयासाठी निवडण्यात आलेल्या कलापथक व लोककलामंचांनी कार्यक्रमांचे सादरीकरण केले. पालघर जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने पालघर जिल्हयातील बोईसर रेल्वेस्थानक परिसर आणि नालासोपारा बाजारपेठ, बसस्थानक आणि वर्दळीच्या ठिकाणी पालघर जिल्हयासाठी निवडण्यात आलेल्या कलापथक व लोककलामंचांनी कार्यक्रमांचे सादरी करण केले. आज दिवसभरात कोकण विभागात विविध ठिकाणी लोककला माध्यमातून राबविण्यात आलेल्या या प्रसिध्दी मोहिस नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. १४ मार्च २०२२ ते रविवार दि. २० मार्च २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com



# रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे माजी प्रांतपाल डॉ.हरिप्रसाद सोमाणी
# कर्तुत्ववान व गुणवंत रोटरी पुरुष सदस्यांचा गुणगौरव समारंभ

## रोटरीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करण्याची संधी



**लातूर/प्रतिनिधी**

रोटरी आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्था असून ती जगातील २१० राष्ट्रांमध्ये विविध समाजपयोगी कार्य करते त्यामुळे रोटरीच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर एक वर्ष नेतृत्व करण्याची उत्कृष्ट संधी प्राप्त होते असे प्रतिपादन रोटरी डिस्ट्रिक ३१३२चे माजी प्रांतपाल, उत्कृष्ट संवाद तज्ज्ञ तथा यशस्वी उद्योजक डॉ.हरिप्रसाद सोमाणी यांनी केले. रोटरी क्लब आफ लातूर होरायजन द्वारा आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिला रोटरी सदस्यांनी पुरुष कर्तुत्ववान व गुणवंत रोटरी सदस्यांचा गुणगौरव समारंभ लातूरतील वाटाड्या प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजनचे अध्यक्ष डॉ.संजय गवई हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जयक्रांती अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोरोबा खुरपे, सत्कार मूर्ती रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे माजी प्रांतपाल तथा नॅबचे नवनियुक्त कार्यकारी सदस्य डॉ.विजयभाऊ राठी, विशेष शिक्षक डॉ.माधव गोरे, डॉ.गुणवंत बिरादार आणि सचिव नीलकंठ स्वामी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी रोटरीच्या प्रथेनुसार मीटिंग कॉल टू ऑर्डर करण्यात आली व राष्ट्रगीताने सुरुवात झाली. पुढे बोलताना डॉ.हरिप्रसाद सोमाणी म्हणाले की, आपण सर्वांनी मला या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रण देऊन विचारमंचावरील सर्व सन्माननीय सत्कारमूर्तींचा माझ्या हस्ते आपण वृक्ष, रोटरी स्मृतिचिन्ह, जलसंवाद पत्रिका आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला त्याबद्दल मी मनस्वी आनंदी आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.रंजीता वाघमारे म्हणाल्या की, सध्या संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा होत आहे आणि यामध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणामध्ये गुणगौरव होत आहे परंतु आम्ही सर्व महिला रोटरी सदस्याना असे वाटले की, आपण आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून आपल्या क्लबमधील कर्तृत्ववान व गुणवंत पुरुष रोटरी सदस्यांचा सत्कार करावा आणि त्यामुळे हा कार्यक्रम याठिकाणी संपन्न होत आहे. यावेळी डॉ.गोरोबा खुरपे, डॉ.विजयभाऊ राठी, डॉ.माधव गोरे आणि डॉ.गुणवंत बिरादार यांनी मनोगतपर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमामध्ये रोटरी नूतन सदस्य माधव भिसे यांनी औसा तालुक्यातील किनिनवरे या गावातील पन्नास वर्षापासून असलेल्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रशासनाच्या सहकार्याने सोडविला त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रोटरी मानद सदस्य म्हणून दैनिक लोकमत टाइम्सचे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा.विनोद चव्हाण यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना डॉ.संजय गवई म्हणाले की, आमच्या क्लबमध्ये डॉक्टर्स सदस्य संख्या जवळपास पन्नास टक्के आहे. आमच्या क्लबमध्ये माजी प्रांतपाल, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील डॉक्टर्स, सिए, उद्योजक आणि विशेष म्हणजे यावर्षी पाच नूतन महिला रोटेरियन्सचा सहभाग आहे असे कर्तुत्ववान सदस्य क्लबमध्ये असल्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्य विषयक विविध उपक्रमात सर्व सक्रिय सहभागी होतात आणि त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होतो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका मंगल डोंगरे यांनी केले तर आभार भारती कांबळे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला वाटाड्याच्या वंदना कुलकर्णी, संचालक डॉ.विकास कुलकर्णी, लक्ष्मी अर्बन बँकेच्या संचालिका कमला राठी, निर्मला सोमाणी, तेजमल बोरा, डॉ. मल्लिकार्जुन हुलसुरे, शेख शमशुद्दीन, प्रा.विद्या आचार्य, प्रतिमा कांबळे, सतीश बोरा, सुजाता गोरे, अस्मिता गोरे, सतीश बोरा, गीतांजली बिरादार, सत्यम बिरादार, शुभम बिरादार, राहुल बेलकुंदे, मुकुंद कुलकर्णी आणि सतीश मस्के यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शुभम बनाळे, प्रणव आकडे, सागर गजले व खंडू यांचे सहकार्य लाभले.

## थोडक्यात वृत्तांत



### ग्राम पंचायत कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांवर भिवंडीत गुन्हे दाखल

**भिवंडी/अभिजित हिरे**

आपल्या प्रलंबित विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचयात कर्मचारी युनियनचे राज्य अध्यक्ष विलास कुमरवार, राज्य सरचिटणीस गिरीश दाभाडकर, ठाणे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय भोईर यांच्या नेतृत्वाखाली विधानभवना वर आक्रोश मोर्चाचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. भिवंडीतील मुंबई नाशिक महामार्गावर असलेल्या मानकोली येथे या मोर्चासाठी राज्यभरातून हजारो कामगार या आंदोलनात सहभागी झाले होते. मात्र या आंदोलनास पोलिसांनी परवानगी नाकारली असतानाही हा मोर्चा काढल्या प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे कोकण विभाग कार्याध्यक्ष दत्तात्रय तुकाराम भोईर रा. शेलार, कोकण विभागीय अध्यक्ष विकास विष्णू भोईर रा. शेलार, तसेच श्याम बाळाराम भोईर रा. वळगाव, कबीर बबन भोईर रा. वळगाव अशा चार जणां विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात बुधवारी रात्री उशिरा विविध कलमांतर्गत व कोविड नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेतपिकांच्या नुकसान भरपाई करिता १२५ कोटी रूपये निधी वितरीत!

मुंबई : जुलै २०२१मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्याबाबत ३ ऑगस्ट २०२१ रोजी घेतलेल्या मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार १२५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे अशी माहिती, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली. जुलै ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतीपिकांकरीता वाढीव दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्य निधीमधून जुलै,२०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता बाधित नागरिकांना निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात उद्‌भवलेल्या पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीकरिता बाधित नागरिकांना मदतीचे वाटप करण्याकरिता वाढीव दराने राज्य निधीमधून एकूण १२५०७.०१ लाख निधी विभागीय आयुक्त यांचेमार्फत जिल्ह्यांना वितरीत करण्यास शासनाची मंजुरी देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय ०७ मार्च २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

### साने गुरूजी कथामालेचा जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धा उत्साहात संपन्न

अहमदपूर : साने गुरुजी कथामाला हेलस जिल्हा शाखा लातूर च्या वतीने आणि ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यांच्या ९५ कथाकथनाच्या उपक्रमाअंतर्गत, जिल्हास्तरावर कथाकथन स्पर्धा अत्यंत उत्साहाचा वातावरणामध्ये संपन्न झाल्या. त्यात जिल्हास्तरावर सर्वप्रथम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आटोळा तालुका चाकूर चे सहशिक्षक प्रमोद हुडगे , द्वितीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वानवडा तालुका औसा च्या सहशिक्षिका शोभा माने,तर तृतीय महात्मा बसवेश्र्वर प्राथमिक विद्यालय लातूर च्या सहशिक्षिका महानंदा मुंडे व संत ज्ञानेश्र्वर विद्यालय अहमदपूरच्या सहशिक्षिका संगीता पाटील यांना विभागून देण्यात आले. नुकताच त्यांचा स्मृतिचिन्ह सन्मानपत्र शाल-श्रीफळ आणि पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कथेचे निरीक्षक म्हणून प्रा.कवि अनिल चवळे, कवि राजसाहेब कदम यांनी काम पाहिले. प्रास्ताविक साने गुरुजी कथामालेचे जिल्हा समन्वयक रामलिंग तत्तापुरे यांनी सूत्रसंचालन सविता पाटील यांनी तर आभार सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार विजेत्या आशा रोडगे यांनी मानले. विजयी स्पर्धकांचे अभिनंदन दलित मित्र डी बी लोहारे गुरुजी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष रामचंद्र तिरुके, सानेगुरुजी कथामाला हेलसच्या मुख्य संयोजिका कल्पनाताई दत्तात्रेय हेलसकर, मुख्याध्यापक व्ही व्ही गंपले, मुख्याध्यापक उद्धव संगारे, पर्यवेक्षक उमाकांत नरडेलेसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

## लोककलाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या प्रसिद्धीस प्रारंभ




**पालघर/प्रतिनिधी**

राज्य शासनाला दोनवर्षे पुर्ण झाल्या निमित्त शासकीय योजना जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी जिल्हा माहिती कार्यालय यांच्यामार्फत तिन संस्थांची निवड करण्यात आली होती. संपुर्ण राज्यात एकाच दिवशी लोककलाच्या माध्यमातून विविध योजनांची प्रसिद्धी करण्यात येत आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय यांच्या माध्यमातून जनजागृती कला मंच, सिद्धी विनायक संस्था, माय नाटक कंपनी या संस्थेने जिल्ह्यात लोककलेच्या माध्यमातून जनजागृती केली. लोक कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी आचोळे गाव, नालासोपारा पूर्व, सोपारा गाव, नालासोपारा पश्चिम, बोळींज नाका तसेच बोईसर येथिल गावांमध्ये कोव्हिड काळात दिलासा (शिवभोजन थाळी), सर्वांगिण विकास (रोजगार), निरंतर शिक्षण सुरू (शिक्षण), पालघर जिल्हा पोलिस सक्षम, वैद्यकिय क्षेत्रात पालघर जिल्ह्याची कामगिरी, इतर सर्व उपक्रम व योजनांची माहिती लोककलावंतांनी सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. या पथनाट्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला.

## वाड्यातील अनंता वणगा यांना काँग्रेसचे पालघर जिल्हा सचिवपद



**वाडा/प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या मान्यतेनुसार, पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सचिव पदी वाड्यातील सामाजिक कार्यकर्ते अनंता वणगा यांची नियुक्ती करण्यात आली. आदिवासी मुक्ती मोर्चा या संघटनेच्या माध्यमातून वणगा यांनी तळागाळातील आदिवासी बांधवांची विविध प्रकारची कामे करून त्यांच्या मनात मनाचे स्थान प्राप्त केले आहे. गोरगरीब आदिवासी बांधवांसाठी ते एक आधारस्तंभ आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या समाज कार्याची दखल घेत त्यांची जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सचिव पदी निवड करण्यात आली आहे. या प्रसंगी काँग्रेस कमिटीचे पालघर जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील, काँग्रेस किसान सभेचे पराग पष्टे, वाडा तालुका अध्यक्ष दिलीप पाटील, गणेश बाराठे, लोकेश पाटील, जगदीश केणे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. समाजसेवक अनंता वणगा यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## वाडा पोलीस ठाण्याच्या सभागृहात शांतता व मोहल्ला कमिटीची बैठक



**वाडा/प्रतिनिधी**

मार्च महिन्यातील होळी, शब्बे बारात व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या अनुषंगाने वाडा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी गुरुवारी (दि.१०) शांतता व मोहल्ला कमिटीच्या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस शांतता व मोहल्ला कमिटीचे पदाधिकारी व सदस्य, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सन व उत्सवा दरम्यान येणाऱ्या अडचणी व समस्यांन बाबत चर्चा केली व महिलांच्या अडचणी, कौटुंबिक वाद, महिला अत्याचार इत्यादी बाबत दशरथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान वाडा पोलिसांच्या वतीने जमलेल्या महिलांचा सत्कार केला. या प्रसंगी अनेक महिलांनी आपले मनोगत व्यक्त करून पोलिसांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

## जैन इरिगेशनच्या रक्तदान शिबिरात ४४१ बाटल्यांचे रक्तदान




**जळगांव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष स्व. भवरलाल जैन यांचे वडील स्व. हिरालालजी जैन अर्थात बाबा यांच्या ३२ व्या स्मृतिदिनी आयोजित रक्तदान शिबिरात ४४१ इतक्या रक्ताच्या बाटल्यांचे संकलन झाले. इंडियन रेडक्रॉस सोसायटी, केशव स्मृति प्रतिष्ठान संचलित स्व. माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तपेढी, सिव्हिल हॉस्पीटल जळगाव या संस्थांनी रक्ताचे संकलन केले. स्व. हिरालालजी जैन यांच्या स्मृतिंना अभिवादन व त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांनी दरवर्षी रक्तदान करण्याचा संकल्प घेतला आहे. कंपनीतील सहकाऱ्यांनी रक्तदान करून रक्ताची गरज असलेल्यांना रक्ताची गरज भागवून सकारात्मकतेच्या दिशेने पाऊल उचलले आहे. त्यानुसार दिवसभर चाललेल्या रक्तदान शिबिरात जैन प्लास्टिक पार्क येथे २८२, जैन फूडपार्क येथे ९७, कांताई नेत्रायल येथे ०४, जैन एनर्जीपार्क-४३, जैन ॲग्रिपार्क व जैन डिव्हाईन पार्क १५, रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले. असे एकूण ४४१ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन झाले. जैन प्लास्टिक पार्क डेमो हॉल येथे सकाळी ८.०० वाजता कंपनीचे जुने सहकारी विजय सूर्यवंशी यांच्याहस्ते औपचारिक उद्घाटन झाले. येथे जैन प्लास्टिकपार्क, टाकरखेडा टिश्युकल्चर पार्क आणि जैन फूडमॉल येथील सहकाऱ्यांनी रक्तदान केले. कांताई नेत्रालय येथे जैन स्पोर्ट अकॅडमी, कांताई नेत्रालय, जैन शॉप व जैन गोडाऊन विभागातील सहकाऱ्यांनी रक्तदान केले. जैन फूडपार्क येथे जैन फूड पार्क, जैन ॲग्रीपार्क, जैन एनर्जीपार्क आणि जैन डिव्हाईन पार्क येथील सहकाऱ्यांनी रक्तदान केले. याचे औपचारीक उद्घाटन सुवन शर्मा यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी जी. आर. पाटील, डॉ. संदीप पाटील, सुनिल गुप्ता, संजय पारख, टी.बी. पाटील, व्ही.पी. पाटील, किशोर बावीस्कर, प्रदीप सांखला, आर. डी. पाटील व जेठमल तापडिया आदि उपस्थित होते. दरम्यान स्व. बाबा यांच्या स्मृतिदिनी सुमारे चौदाशेहून अधिक जणांनी भोजनाचा आस्वाद घेतला. यात बालक आश्रम, हरिजन सेवक संघ मुलींचे वसतीगृह, गायत्री मंदीर, बाबा हरदास संघ आदी ठिकाणी भोजन पाठविले गेले त्याच प्रमाणे हेच मिष्टान्न स्नेहाच्या शिदोरी उपक्रमातील पाकीटातून वितरीत करण्यात आले.

## महिला साफसफाई कामगारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार




**लातूर/करकरे अंबादास**

जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने लातूर शहरातील प्रभाग क्र. १५ या भागात लातूर शहर महानगरपालिका झोन (ब) येथील महिला सफाई कामगार यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास फाऊंडेशन च्या समन्वयक संगिता मोळवणे, प्रा. राजकुमार जाधव मा. सभापती मनपा लातूर, ॲड. सुनंदा इंगळे, प्रीतम जाधव (उद्योजिका), उर्मिला मुगळे (संचालिका) प्रा. डॉ. गुणवंत बिराजदार, प्रा. संजय गुंगार्डे, मल्लिकार्जुन वाघमारे विलास जिल्हावार, धनराज आष्टके, लक्ष्मण मुकडे, गुरुलिंग शेट्टे, रूद्रेश्वर स्वामी, कुलदीप माने, केशवराव डोके, बिराजदारआण्णा, रमाकांत घवले, बोयणे स्वच्छता निरीक्षक सिध्दाजी मोरे, सुरेश कांबळे, देवेंद्र कांबळे, महेंद्र खाडकन, श्रीमंत गायकवाड, शेख इत्यादी मनपा कर्मचारी आणि प्रभागातील नागरीक उपस्थित होते उपस्थित होते.

## औसा येथील शिंदाळा ६० मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्पासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात ५७७ मेगावॅट वीज निर्मिती करणारे कांही सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी आज अर्थसंकल्प मांडताना जाहीर केले आहे. यात लातूर जिल्ह्यातील सिंदाळा येथील ६० मेगावॉट वीजनिर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. यानिमित्ताने २०० ते २५० कोटी रुपये गुंतवणूक असलेला मराठवाड्यातील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प मार्गी लागल्याचे समाधान असल्याचे सांगून यानिमित्ताने लातूरकरांची स्वप्नपूर्ती झाल्याची प्रतिक्रिया राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भाने बोलताना ना. अमित देशमुख यांनी म्हटले आहे की केंद्रात अवजड उद्योग मंत्री असताना आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी भेल आणि महाजनको यांच्या संयुक्त विद्यमाने औसा तालुक्यातील शिंदाळा परिसरात औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचा संकल्प केला होता. महाजनकोच्या माध्यमातून यासाठी जमीनही खरेदी करण्यात आली होती, मात्र केंद्रात झालेले सत्तांतर व इतर कारणाने तेव्हा तो प्रकल्प आकार घेऊ शकला नाही त्यानंतर या ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याची संकल्पना पुढे आली. त्यासाठीची प्रक्रिया गेली अनेक वर्ष सुरु आहे, आज अखेर या प्रकल्पाला मूर्त स्वरूप देण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

कोरोना महामारी च्या संकटामुळे मागची दोन वर्ष राज्यातील आणि देशातील विकास प्रक्रिया मंदावली होती. कोरोना चा प्रादुर्भाव आत्ता नियंत्रणात आल्यामुळे राज्यातील विकास प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय महाविकास आघाडीचे नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री ना उद्धवजी ठाकरे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार तसेच महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांनी घेतला आहे. या निर्णयाचा परिणाम म्हणून राज्याच्या विकासाला गती देणाऱ्या अनेक योजना आजच्या अर्थसंकल्पातून जाहीर करण्यात आल्या आहेत.

कृषी. उद्योग. शिक्षण यासह सर्वच क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचे जाहीर करताना राज्याच्या विकासाची गती वाढवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वीज निर्मितीवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. थेट शासकीय गुंतवणुकीतून राज्यात ५७७ मेगावॅट वीज निर्मिती करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील शिंदाळा, उस्मानाबाद जिल्ह्यातील कौडगाव, धुळे जिल्ह्यातील साक्री त्याचबरोबर वाशिम. चंद्रपूर यवतमाळ या जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात शिंदाळा येथे



११७ हेक्टर जमिनीवर हा प्रकल्प आकार घेणार असून त्यासाठी २१० ते २५० कोटी रुपये खर्च होणार आहेत. यासाठी वीज कनेक्टिविटी कंत्राटदार नियुक्ती यासह सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आलेले आहेत, आता शेवटी त्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद झाल्याने लातूरकरांचे स्वप्न साकार होणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद झाल्यामुळे प्रकल्प उभारणीचे काम लगेच सुरु होईल अशी माहिती महाजनकोचे कार्यकारी अभियंता गुणाले व महाउर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक कुलकर्णी यांनी दिली आहे.

14 TO 20 MARCH 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/03/2022 10:00 PM Page 1



# भिवंडीत जमिनीच्या वादातून बापानेच केली मुलाची हत्या!

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी तालुक्यातील शेतजमीनींना आलेला कोट्यवधींचा भाव आज अनेकांच्या मुळावर उठत आहे .यामुळे अनेकांच्या हत्या घडत आहेत आणी असाच काहीसा प्रकार भिवंडी तालुक्यातील कशिवली या गावात घडला असून तेथे सख्ख्या बापाने मुलाच्या मदतीने आपल्या मोठ्या मुलाची हत्या करण्याची घटना घडली आहे. काशिनाथ कचरू पाटील (५५) असे हत्या झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.तर कचरू गोविंद पाटील व गणेश कचरू पाटील अशी अटक केलेल्या वडील व भावाची नावे आहेत. तालुक्यातील धामणगाव कशिवली या गावातील काशिनाथ पाटील व त्यांचे वडील कचरू पाटील व भाऊ गणेश यांच्यात मागील वर्षभरापासून जमिनीच्या वाटणी वरून वाद सुरू होता. त्यातच मयत काशीनाथ पाटील व त्यांचा मुलगा धनंजय असे शेतावर जळणासाठी लाकूडफाटा जमा करण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी काशीनाथ पाटील यांचे वडील कचरू व भाऊ गणेश हे त्यासाठी येऊन यापूर्वी तू जीवानिशी वाचला पण आता नाही वाचू शकणार असे सांगत शिवीगाळ करीत त्यास शिवीगाळ करीत मारहाणीस सुरवात केली .त्यानंतर गणेश याने पुतण्या धनंजय यावर कुऱ्हाडी सह लाठीकाठीने हल्ला करीत



जखमी केले असता वडील काशीनाथ मुलाच्या बचावा साठी पुढे आले असता वडील कचरू यांनी कुऱ्हाडीने मुलाच्या डोक्यावर वार करून जखमी केले व त्यानंतर वडील व भावाने काशीनाथ यास मारहाण करून जबर जखमी केले. यानंतर मुलगा धनंजय याने जखमी रक्तबंबाळ झालेल्या वडिलांना रुग्णालयात दाखल केले असता त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. या दुर्दैवी घटने नंतर भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे नातू धनंजय याने आजोबा कचरू पाटील व काका गणेश पाटील यांनी आपल्या वडिलांची हत्या केल्याची फिर्याद भिवंडी तालुका दिली असता पोलिसांनी हत्ये सह जबरी मारहाण केल्याप्रकरणी बाप लेका विरोधात गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे.तर या गुन्ह्याचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय बारोट हे करीत आहेत.

# विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प -अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी**

शेतकरी, उदयोजक, व्यापारी, कामगार, कलाकार, महिला, विदयार्थी सर्व समाज घटकांना न्याय देण्याच्यादृष्टीने आरोग्य, शिक्षण, कृषी, जलसंपदा, उर्जा, सांस्कृतिक यासह सर्व विभागासाठी भरीव आर्थिक तरतूद करून महाराष्ट्र राज्याला कायम प्रगतीपथावर ठेवणारा अर्थसंकत्प राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केला असल्याची प्रतिक्रीया राज्याचे वैदयकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र राज्य विधीमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान आज शुक्रवार दि. ११ मार्च रोजी अर्थसंकल्प सन २०२२ सादर केल्या नंतर अमित देशमुख यांनी प्रतिक्रीया वयक्त करतांना म्हटले आहे की, सलग दोन वर्ष कोरोना प्रादूर्भावामूळे राज्याला अनेक अडचणीचा सामना करावा लागला होता. या परिस्थितीतून बाहेर पडून विकासाची गती पकडण्यासाठी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वातील राज्यातील महाविकास आघाडीच्या सरकारने नियोजनबध्द प्रयत्न सुरू केल असून आज सादर झालेला अर्थसंकल्पातून ते दिसनू येत आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्प सादर करतांना राज्यातील प्रत्येक घटकाला न्याय मिळेल याची दक्षता घेतली असल्याचे दिसून येत आहे. ग्रामिण भागातील जिवनमान उंचावण्यासाठी विभागनिहाय कृषी संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. जलसंपदा विभागाला तब्बल १३ हजार २५२ कोटींचा भरीव निधी ठेवण्यात आला असून शेततळयासाठी ७५ हजारा पर्यंत अनुदान वाढविले आणि पशुसंवर्धनाला चालना देण्याचे उल्लेखनीय निर्णय घेण्यात आले आहेत. कोरोना महामारीत आलेले अनुभव लक्षात घेता आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी ११ हजार कोटी रूपयाची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. अदययावत वैदयकीय शिक्षण सुविधा उभारणे आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा वाढविणे बरोबर प्रत्येक जिल्हयात महिला रूग्णालय तसेच ट्रामा केअर सेंटर सुरू करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी झोपडपटटी सुधार योजनेला गती देणे, अल्पसंख्याक वर्गासाठी स्वतंत्र पोलीस भरती योजना राबविणे, ओबीसी राजकीय आरक्षणासाठी स्वतंत्र समिती स्थापन करणे आदी योजनांचाही या अर्थसंकल्पात समावेश आहे. कोणत्याही राज्याचा विकास मोजतांना प्रति माणसी विजेच्या वापराचा विचार केला जातो ही बाबत लक्षत घेता देशात प्रथम क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्राचे कायम प्रथम क्रमांकाचे रहावे यादृष्टीने ऊर्जानिर्मीती आणि विज वितरण सुविधा उभारण्यासाठी ९ हजार ९०० कोटी रूपयाची तर सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी लातूर जिल्हयातील सिंदाळा (६० मेगावॅट), ऊस्मानाबाद जिल्यातील कौडगाव, धुळे जिल्हयातील साक्री तसेच वाशीम, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्हयात एकुण ५७७ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. या शिवाय राज्यात लहान मोठया असंख्य सौर प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील शालेय व शैक्षणिक सुविधांच्या बळकटी करणासाठी या अर्थसंकल्पात २ हजार ३५४ तर उच्च आणि तंत्र शिक्षण विभागासाठी १ हजार ६१९ कोटी रूपय एवढा भरघोस निधी देण्यात आला आहे.कोरोना प्रादूर्भावातील निर्बधामूळे अडचणीत आलेल्या कलाकार व कलावंतांना आधार देता यावा यासाठी या अर्थसंकल्पात सांस्कृतिक विभागासाठी १९३ कोटी रूपये निधी देण्यात आला आहे. कोरोना प्रादूर्भावातील निर्बधामूळे अडचणीत आलेल्या कलाकार व कलावंतांना आधार देता यावा यासाठी या अर्थसंकल्पात सांस्कृतिक विभागासाठी १९३ कोटी रूपये निधी देण्यात आला आहे. या शिवाय भारतरत्न लता मंगेशकर यांच्या नावे संगीत महाविदयालय सुरू करण्यासाठी १०० कोटीचा विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. एंकदरीत राज्यातील सर्व समाज घटकांचा उत्कर्ष व्हावा आणि विकासाच्या वाटेवर महाराष्ट्र राज्य गतिमान राहावे या उद्देशाने हा महाविकास आघाडीने सादर केलेला अर्थसंकल्प असल्याचे श्री. अमित देशमुख यांनी म्हटले आहे.

# वसईत रंगला शेषवंशीय क्षत्रिय भंडारी समाजाचा प्रीमियर लीग क्रिकेट सामना

**वसई/प्रतिनिधी**




वसई तालुक्यातील शेषवंशीय क्षत्रिय भंडारी समाजाच्या क्रीडा विभागातर्फे भंडारी प्रिमीयर लीग या क्रिकेट सामन्याचे नुकताच आयोजन करण्यात आले होते. चिमाजी अप्पा मैदानात एक दिवसीय रंगलेल्या या सामन्यात व्हीएआर सनराईजर फायनल या संघाने अंतिम सामना खेळत विजयावर आपली मोहोर उमटवली आहे. समाजातील तरुणाईला एकत्र आणत त्यांच्यातील कलेला वाव देण्यासाठी भंडारी समाजातर्फे भव्य क्रिकेट सामन्याचे आयोजन केले होते. आयपीएल च्या धर्तीवर संघांची विभागणी करत एकूण दहा संघांमध्ये खेळविलेल्या या सामन्यात एकूण १७० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचे उदघाटन आमदार क्षितिज ठाकूर, आमदार राजेश पाटील, माजी महापौर प्रवीण शेट्टी, अध्यक्ष राजेश राऊत यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू सेजल राऊत आणि मनाली दक्षिणे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर दहा संघांमध्ये आपापसात दोन विभागात सामने घेण्यात आले. या दोन्ही विभागातील सामन्यातून अंतिम फेरीत व्हीएआर सनराईजर आणि आरटीजी किंग्स हे दोन संघ सहभागी झाले होते. या दोघांच्या लढतीत आरटीजी किंग्स संघावर मात करत व्हीएआर सनराईजर संघाने विजय मिळविला आणि ट्रॉफी आपल्या नावावर केली. त्यामुळे आरटीजी किंग्सला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले तर आर्यन नाईट रायडर्स आणि पीव्हीआर इंडियन्स या दोन्ही संघांना तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच या सामन्यात मॅन ऑफ द सिरीज विनीत चौधरी आणि बेस्ट बॉलर हा 'किताब शिशिर पाटील याने पटकावला आहे. तर बेस्ट बॅट्समॅन हा 'किताब स्वप्नील पाटील याने आपल्या नावावर केला आहे. सामन्याच्या पारितोषिक वितरण समारंभात खासदार राजेंद्र गावित, प्रवीण शेट्टी, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष पंकज ठाकूर, माजी रणजीपटू राहुल ठाकूर यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते विजयी संघाला आणि खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. यावेळी खासदार गावित यांनी उपक्रमाचे कौतुक केले. तसेच शिवाजी महाराजांच्या काळापासून त्यांचे मावळे म्हणून भंडारी समाजातील लढवय्ये समाज बांधव अग्रेसर असल्याचे सांगितले. तर पंकज ठाकूर यांनी क्रिकेट खेळासह शारीरिक तंदुरुस्तीचे दृष्टीने इतर मैदानी खेळ सुद्धा खेळले गेले पाहिजे असे सांगितले.

# महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेला सुरवात

**जळगाव/प्रतिनिधी**




महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेस आज अनुभुती आंतरराष्ट्रीय स्कूलच्या मैदानावर सुरुवात झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण २१ जिल्हे व १५ क्रिकेट क्लब सहभागी होत आहे. जळगांव येथे त्यातील ५ सामने आयोजित करण्याची जबाबदारी आहे. जळगांव येथील या स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध उद्योगपती सुहांस केमिकलचे संचालक संदीप काबरा यांच्या शुभहस्ते व जैन इरगेशनचे मीडिया उपाध्यक्ष अनिल जोशी, निवड समिती सदस्य कैलाश पांडे, सामन्याचे पंच विवेक केतकर व नरेश मकवाना यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जळगांव जिल्हा असोसिएशनचे सचिव अरविंद देशपांडे यांनी केले. आज रोजी झालेला पहिला सामना जालना जिल्हा क्रिकेट असोसिएशन विरूद्ध जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या दरम्यान झाला नाणेफेक जिकून प्रथम फलंदाजी करत जळगाव संघाने ५२.३ षटकात सर्व गडी बाद १३५ धावा केल्या त्यात साहिल गाईकर ५५, धवल हेमनानी २०, व कर्णधार राहुल निंभोरे १५ धवांचा समावेश होता जालना जिल्हा क्रिकेट संघातर्फे गोलंदाजी करतांना व्यंकटेश काणे व विकास सुम्मारे यांनी प्रत्येकी ४ गडी बाद केले. प्रतिउत्तरात जालना जिल्हा संघ ३१.३ षटकात सर्व गडी बाद १०८ धावाच करु शकला आणि जळगाव जिल्हा संघाने २७ धावांची आघाडी घेतली जळगांव तर्फे गोलंदाजीत धवल हेमननी ४ जितेंद्र पाटील ३ व राहुल निंभोरे याने १ गडी बाद केले. उद्या दुसऱ्या दिवसाचा खेळ बाकी असून त्यात काय निर्णय होईल हे बघावे लागेल. अर्थात जळगांव संघाने पहिल्या डावात महत्वपूर्ण अशी २७ धावांची आघाडी घेतली आहे.

# महापालिकेच्या चौथ्या मजल्यावर शॉर्टसर्किट होऊल लागली आग



**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार शहरात आग लागण्याच्या घटना काही थांबायचे नाव घेत नाही किंबहुना आता आगीच्या घटना या वसई विरार महापालिका मुख्यालयात देखील घडताना दिसत आहेत. वसई विरार महापालिकेच्या विरार मुख्यालयातील चौथ्या मजल्यावरील गोडाऊन वजा इलेटक्ट्रिक केबिनमध्ये अचानकपणे शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची घटना मंगळवारी दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास घडली. भर सभागृहात ही बातमी समजल्यावर काही वेळ एकच गोंधळ उडाला होता मात्र प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला आहे. ही आग लागताच त्यावर उपस्थित कर्मचाऱ्यांनी आग नियंत्रण सहित्य फवारणी करून ही आग तात्काळ विझविल्याने पुढील मोठा अनर्थ टळला असल्याचे उपस्थित नगररचना कर्मचारी वर्गाने लोकमतला सांगितले. याप्रसंगी सभागृहात पालिका प्रशासनाच्या वतीने नगररचना विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती मात्र १ एप्रिलपासून बांधकाम परवानगी ऑनलाइन करणे बाबतीतली एक महत्त्वाची बैठक व प्रात्यक्षिक देखील याठिकाणी सुरू होते. आग लागल्याचे समजताच तात्काळ येथील सभागृहात उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्गास सुरक्षितता म्हणून पालिका मुख्यालयाबाहेर हलवण्यात आले. ही आग केवळ थोडेसे शॉर्टसर्किट होते तर त्यात काहीही नुकसान झालेल नाही. उपस्थित कर्मचाऱ्यांनी तात्काळ आग नियंत्रण साहित्य फवारणी केल्याने सर्व काही सुरक्षित राहिले अर्थात पालिकेने आम्हाला माहितीसाठी या घटनेची वर्दी दुपारी दिली असल्याचे मुख्य अग्निशमन दलाचे प्रमुख दिलीप पालव यांनी सांगितले. विशेष म्हणजे यापूर्वी देखील सहा ते आठ महिन्यापूर्वी नगररचना विभागात शॉर्टसर्किटची अशीच एक घटना घडली होती तर ही घटना दुसरी पुनरावृत्ती असल्याचे सांगत अशा घटनांना वेळीच आळा घातला पाहिजे.

**पान ८ वरून...**

## वसईत 'भरोसा सेल'चे पोलिस आयुक्त ...

या कक्षाच्या संकल्पनेबद्दल बोलताना पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी सांगितले की, मला भेटायला येणाऱ्या १० पैकी ७ अभ्यागत महिला असतात आणि महिलांच्या सर्वाधिक तक्रारी या कौटुंबिक असतात. महिला कुटुंबात सुरक्षित नाही हे समाजातील विदारक वास्तव आहे. यासाठी महिलांना न्याय देण्यासाठी त्याना सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी भरोसा कक्ष काम करणार आहे. भरोसा कक्षात महिला पोलीस अधिकारी, डॉक्टर, मानसोपचारतज्ज्ञ, वकील आणि समुदपेशक आदींचा समावेश आहे. महिलांविषयक तक्रारी आल्यानंतर कक्षामार्फत महिलांना बोलावून त्यांचे समुपदेशन करम्ण्यात येणार आहे. पीडित महिलांना वैद्यकीय साहाय्यता आणि प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी विधिविषयक सेवा दिली जाणार आहे. महिलांना एकटे न सोडता त्यांना राहाण्याची सोय नसेल तर ती पुरविण्यात येणार आहे. पीडितेला न्याय मिळेपर्यंत तिची तक्रार बंद न करता शेवटपर्यंत सर्व मदत दिली जाणार आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त आदिवासी...

तसेच दैनंदिन जिवन रेखाटले असून हे बोलके चित्र समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी सांगितले. वारली चित्रकार सुचिता कामडी यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री भोईर, स्वराली वरठा, तन्वी वरठा, शालीनी कासार, मनिषा धिंडे या चित्रकारांनी वारली चित्र साकारले.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा ...

वरील योजनेतील अर्थसाहय न मिळाल्याने वरील मयत शेतकऱ्याच्या वारसदारास दररोज कृषी कार्यालयात येवुन परत-परत हेलपाटे मारावे लागत आहे तर चक्क कृषी कार्यालय हे आमच्या हातात नाही, जिल्हास्तरावुन चालतेय असे कृषी कार्यालयातुन सांगितले जाते. तर तालुका कृषी कार्यालयचा पाठपुरावा कमी पडत असल्याचा लाभार्थ्यांचा अरोप होत आहे. आता या लाभार्थ्यांना न्याय कोण देणार आणखीन किती दिवस वाट पहावे लागाणार याकडे विमा कंपनी व संबंधित प्रशासनाने वेळीस लक्ष घालुन लाभार्थ्यास न्याय मिळवुन द्यावे आन्यथा मातंग अस्मिता संघर्ष सेनेच्या वतीने सदनशीर मार्गाने अंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**पान १ वरून....**

## सुंदर भाईशी पंगा महागात पडला...

माहिती अज्ञात व्यक्तीने शाहूनगर पोलीस ठाण्यात फोन करून दिली. मात्र सदरची हद दादर लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याचे कारण देत शाहूनगर पोलिसांनी तिकडे जाणे टाळले. त्यांनी ही माहिती दादर लोहमार्ग पोलिसांना दिली. त्या दिवशी दादर लोहमार्ग पोलीस ठाण्यात रात्रपाळीला पोलीस उप निरीक्षक आढारी हे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होते. त्यांना या घटनेची माहिती मिळताच ते तातडीने पोलीस पथकासह घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी साधारण २० ते २५ वयोगटातील एक व्यक्ती जखमी अवस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्यावर, चेहऱ्यावर व शरीरावर वेगवेगळ्या ठिकाणी धारदार शस्त्र, टणक साहित्याने वार तसेच बांबूने मारहाण करण्यात आल्याचे दिसत होते. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला पोलिसांनी तातडीने सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी पंचनामा करून ते प्रेत पोस्टमोर्टम साठी रवाना केले. या प्रकरणी सरकार तर्फे पो.उप नि. वसंत निवृत्ती आढारी यांच्या तक्रारी वरून दादर रेल्वे पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा र.जि.नं. १३०/२०२२ कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद,मध्य परिमंडळचे पोलीस उप आयुक्त मनोज पाटील व सीएसएमटी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त उध्दव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली दादर रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश चिंचकर, पोलीस निरीक्षक धर्मेंद्र आवारे, सहाय्यक पोलीस निरिक्षक अर्जुन घनवट, पो.उप निरीक्षक वसंत आढारी, सपोउपनि अतुल जांभळे, पोहवा.प्रविण सोनवणे, अशोक नरवडे, महेंद्र शिंदे, पो.ना. विवेकानंद पाटील, सुशिल वाघ, हरेश्वर भांडारकर, प्रविण माळी, पो.शि. भैय्या जगताप, किरण परदेशी, स्वप्नील नागरे तसेच वाहनचालक संतोष यादव व विष्णु कांबळे इत्यादी सखोल तपास करू लागले. दरम्यान पोलीस पथक मृतकाची ओळख पटवत असताना, सायन रुग्णालयात मृतक व्यक्तीचे काही नातेवाईक कामाला असल्याने त्यांनी तो मृतदेह ओळखला. मृतक व्यक्तीचे नाव सिध्दार्थ सुधीर निकम उर्फ सिध्दु (वय २२) असल्याचे निष्पन्न झाले. सिध्दार्थ हा टिटवाळा, धनगरवाडी येथे पत्नी आणि दोन मुलांसह राहत होता. त्याची आजी माटुंगा लेबर कॉप येथील संजय गांधी नगरमध्ये राहत होती. तो अधूनमधून आजीच्या भेटीला येत होता. आजीकडे राहत होता. सिध्दार्थ राहत असलेल्या माटुंगा लेबर कॅम्पमध्ये सुंदर रावनेश नायडु (वय २२) हा पत्नी आणि मुलांसह राहत होता. सुंदर आणि सिध्दार्थ यांचे पूर्वी पासून पटत नव्हते. त्यांचे पुर्व वैमनस्यावरुन भांडण झाले आहे. अशी माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी खबऱ्या मार्फत माहिती काढली असता, सुंदर नायडु आणि त्याच्या मित्रांनी सिद्धार्थचा खून केल्याची माहिती माहिती प्राप्त झाली. पोलिसांनी तांत्रिक तपास करून गुन्ह्यातील संशयित आरोपी सुंदर नायडु (२२), विशाल राकेश चावरीया उर्फ छोटा विशाल (२२), हिमाल मेघराज सिंग उर्फ नेपाळी (२१), विशाल गिरीश काकडे उर्फ डॅनी (१९), गणेश नरसिंह आवलल्लु उर्फ मामा (२२), लक्ष्मण बालचंद जैसवार (२५) व कल्पेश शेषराव डोंगरे (२६) अशा सात जणांना अटक केली. पोलिसांनी त्यांचा कडे चौकशी केली असता वेगळी माहिती पुढे आली. सिद्धार्थ आणि सुंदरचे पुर्वी पासून भांडण होते. सिद्धार्थ हा गुन्हेगार पार्श्वभूमीचा आहे. त्याच्यावर मुंबई, कर्जत, टिटवाळा ,राबळे पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. त्याची परिसरातील दहशत आहे. त्यामुळे त्याला टक्कर देणे शक्य नव्हते. विशेष म्हणजे सिद्धार्थने सुंदर नायडू याच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ केली होती. ही गोष्ट सुंदरने त्याचा मेव्हणा विशाल चावरीया याला सांगितली. त्यामुळे तो ही पेटून उठला. शेवटी या दोघांनी मित्राच्या मदतीने सिद्धार्थचा काटा काढण्याचा बेत पक्का केला. दिनांक २४ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री २:१५ वाजण्याचे पुर्वी माटुंगा रेल्वे स्टेशन ते सायन रेल्वे स्टेशन खांबा नं. १०/१५४ व १०/१५६ चे मध्ये माटुंगा लेबर कॅम्र फुट ओव्हरब्रीजचे खाली डाऊन स्लो ट्रॅक नं १ येथे सिध्दार्थ उर्फ सिध्द सुधीर निकम हा नशापाणी करताना बसला होता. त्यावेळी सुंदर नायडु, विशाल राकेश चावरीया उर्फ छोटा विशाल, हिमाल मेघराज सिंग उर्फ नेपाळी, विशाल गिरीश काकडे उर्फ डॅनी, गणेश नरसिंह आवलल्लु उर्फ मामा, लक्ष्मण बालचंद जैसवार व कल्पेश शेषराव डोंगरे हे तेथे आले. या सात ही जणांनी पुर्व वैमनस्यावरुन संगनमत करुन सिध्दार्थ उर्फ सिध्द सुधीर निकम यास धारदार शस्त्र, दगड, बिअर बॉटल व बांबुने मारहाण करून त्यास जबर जखमी करुन त्याचा खून केल्याचे गुन्हयांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. फिर्यादी पो.उप नि. वसंत निवृत्ती आढारी, (दादर रेल्वे पोलीस ठाणे) यांनी तक्रार दिल्याने दादर रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा र.जि.नं. १३०/२०२२ कलम ३०२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर दाखल गुन्हयांच्या तपासाअंती कलम ३२४,२०१,१२० (ब), १४९, १४३, १४४,१४७,१४८,१४९ अन्वये कलम वाढविण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद मध्य परिमंडळचे पोलीस उप आयुक्त, मनोज पाटील, सीएसएमटी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त उध्दव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली दादर रेल्वे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश चिचकर, पोलीस निरीक्षक धर्मेंद्र आवारे, सहाय्यक पोलीस निरिक्षक अर्जुन घनवट, पो.उप निरीक्षक वसंत आढारी, सपोउपनि अतुल जांभळे, पोहवा.प्रविण सोनवणे, अशोक नरवडे, महेंद्र शिंदे, पो.ना. विवेकानंद पाटील, सुशिल वाघ, हरेश्वर भांडारकर, प्रविण माळी, पो.शि. भैय्या जगताप, किरण परदेशी, स्वप्नील नागरे तसेच वाहनचालक संतोष यादव व विष्णु कांबळे यांनी सखोल व कौशल्यपुर्ण तपास करुन खुनाच्या गुन्हयांतील आरोपीतांना गुन्हा घडल्यापासुन २४ तासाच्या आत जेरबंद करण्याची उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# लातूर येथील तरुण-तरुणीची अहमदपूर येथे आत्महत्या

**अहमदपूर/फिरोज शेख**

शहरापासुन जवळच असलेल्या नांदेड रोडवरील गुगदळ शिवारातील अभिजीत कराड यांच्या शेतातील विहरीत उडी मारून लातुर येथील तरुण तरुणी यांनी पळून येऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घडली असुन सदरील घटनेची अहमदपूर पोलीसांत आकस्मित मृत्युची नोंद करण्यात आली आहे.



याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की लातुर येथील रहिवाशी असलेले संतोष सज्जनराव मादंळे वय ३९ वर्ष व्यवसाय नौकरी रा. न्यु भाग्य नगर लातुर यांनी अहमदपूर पोलीस स्टेशन येथे हजर होऊन माहीती दिली की, मी वरील प्रमाणे सदरील ठिकाणचा राहणारा असुन मी लातुर येथे रेल्वे विभागा मध्ये सिनियर टेक्नीशिएशन म्हणुन काम करतो. मला एक भाऊ लक्ष्मण मादंळे असा असुन त्यांना पत्नी, दोन मुली नामे सोनम वय १९ वर्ष (मयत) नंदीनी वय १५ वर्ष व एक मुलगा नामे आर्यन असे असून भाऊ हा ऑटो चालवुन कुंटुंबाचा उदरनिर्वाह भागवता. दिनांक ५ मार्च रोजी मुलगी सोनम ही ११:३० वाजण्याचे सुमारास ब्युटी पार्लला जात आहे असे सांगुन घराबाहेर निघुन गेली व दुपारी ३ वाजता तिला फोन करून कोठे आहे असे विचारले असता तिने विवेकानंद चौक लातुर येथे असल्याचे सांगितले व त्यानंतर ती त्या दिवशी परत घरी आलीच नाही म्हणुन आम्ही तिचा शोध घेतला असता ती मिळुन आली नाही म्हणून आम्ही दिनांक ७ मार्च रोजी पोलीस स्टेशन विवेकानंद चौक लातुर येथे मिसींगची तक्रार दिली. त्यानंतर दिनांक ११ मार्च रोजी सकाळी १०:०० वाजण्याचे सुमारास पोलीस स्टेशन अहमदपुर येथून फोन आल्यानंतर कळाले की, २० ते २२ वर्ष वयाचे एक मुलगा व एक मुलगी असे दोघेजण विहीरीत मृत अवस्थेत आहेत. त्यांचा ड्रेस कोड विचारला तेव्हा मुलीचा ड्रेस कोड हा आमचे मुलीशी जुळत असल्याने आम्ही पोलीस स्टेशन अहमदपुर येथे येवून गुगदळ शिवारात अभिजीत व्यंकटराव कराड यांचे विहीरीत जावुन पाहीले असता तेथे माझा भाऊ लक्ष्मण मादंळे यांची मुलगी नामे सोनम लक्ष्मण मादंळे वय १९ वर्ष रा. भाग्य नगर लातुर व मुलगा हा आमचे गल्लीतील अभिजीत केदार शिंदे वय १९ वर्ष रा. न्यु भाग्य नगर लातुर असे मयत अवस्थेत दिसले आहेत असल्याच्या खबरी वरून अहमदपूर पोलीसांत सदरील दोन्ही मयतांची आ.म्र.नं १५/ २२ कलम-१७४ सीआरपीसी प्रमाणे आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून दोन्ही प्रेताचे अहमदपूर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. सदरील घटनेप्रसंगी सहाय्यक पोलीस निरिक्षक रामचंद्र केदार, पोलीस उपनिरिक्षक बालाजी पल्लेवाड, पोकॉ प्रशांत किर्ते, पोना आरदवाड, पोना कावळे, पोना राजगीरवाड, पोहेका व्ही.जी. सन्मुखराव यांनी मदत केली. सदरील घटनेचा पुढील तपास पोलीस निरिक्षक चिदांबर कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक प्रभाकर अंधोरीकर हे करीत आहेत.

# वाडा पंचायत समितीच्या उपसभापतीपदी सागर ठाकरे

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा पंचायत समितीच्या रिक्त झालेल्या उपसभापती पदाच्या निवडणुकीत अपक्ष सदस्य सागर ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली. वाडा पंचायत समितीचे उपसभापती अमोल पाटील यांनी काही दिवसांपूर्वी राजीनामा दिल्यानंतर उपसभापतिपद रिक्त झाले होते. त्यामुळे उपसभापतिपदाची निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत ठाकरे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. पंचायत समितीवर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीची सत्ता आहे. मोज गणातून शिवसेनेचे बंडखोर उमेदवार सागर ठाकरे हे अपक्ष म्हणून निवडूक जिंकले होते. विजयानंतर ठाकरे यांनी शिवसेनेला पाठिंबा दिला होता. त्यावेळी शिवसेनेने त्यांना उपसभापतिपदाचं आश्वासन दिलं होतं. त्यामुळे शिवसेनेअंतर्गत ठरलेल्या धोरणानुसार उपसभापती अमोल पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी अपक्ष सदस्य ठाकरे यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांनी नवनिर्वाचित उपसभापती सागर ठाकरे यांचा सत्कार केला. याप्रसंगी पालघर जिल्हा परिषदेचे माजी उपसभापती नीलेश गंधे, वाडा पंचायत समितीचे सभापती रघुनाथ माळी, माजी उपसभापती अमोल पाटील, तालुकाप्रमुख उमेश पटारे, तालुका सरचिटणीस नीलेश पाटील, जिल्हा परिषद सदस्य अरुण ठाकरे, नगरसेवक संदीप गणोरे, अमित रोडगे शहरप्रमुख प्रमोद घोलप आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्पीड जम्प रोप स्पर्धेत वाड्याच्या मुलांना गोल्ड मेडल



**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय सब जुनिअर व सिनीअर जम्प रोप स्पर्धा २०२२ चे आयोजन नाशिक येथे ४ ते ६ मार्च दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धात देशातील बारा राज्यांनी भाग घेतला. वाड्यातील मुले व मुलींच्या गटाने गोल्डमेडल पटकावले. वाडा तालुक्यातील मेघवाला पाडा ही शाळा आदिवासी बहुल वस्तीतील आहे. येथील शिक्षक मेहनती असल्याने केंद्र, तालुका व जिल्हा स्तरावर होणाऱ्या सर्वच स्पर्धात येथील विद्यार्थी भाग घेऊन यश संपादन करतात. नाशिक येथे झालेल्या राष्ट्रीय स्पीड जम्प रोप स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेघवाला पाडा शाळेतील आचला मेघवाले, राशी कुऱ्हाडे, जान्हवी कडव, या मुलींनी सबज्युनिअर स्पीड जम्प रोप स्पर्धेत गोल्डमेडल पटकावले तर ऋतिक काटकरी, आदित्य टोके, ओमकार टोके यांना मुलांच्या ज्युनियर गटात गोल्ड मेडल मिळाले. आता त्यांची निवड आग्रा येथे पुढील स्पर्धेत झाली आहे. जिल्हा पालघर रोप असोसिएशनचे यांनी या मुलांना सचिव प्रशांत पारगावकर मार्गदर्शन केले तर मुख्याध्यापक गुरुनाथ लहांगे यांनी मुलांचा सराव करून घेतला. या राष्ट्रीय जम्प रोप स्पर्धेत यश संपादन केल्या बद्दल शाळेचे व मुलांचे तालुक्यातुन अभिनंदन होते आहे.

# अंबरनाथमध्ये घरफोडी आणि मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्याला अटक

**अंबरनाथ/सुनिल तांबे**

अंबरनाथमध्ये जावसई परिसरातील राममंदिर आणि शिवमंदिर येते आठवड्या अगोदर चोरी झाली होती. मंदिरा मधील दानपेठीतील रक्कम, चांदीचा पाळणा, त्यांब्याचे लोठे घेऊन चोर पसार झाला होता. ही घटना घडल्यावर अंबरनाथ पोलीस स्टेशनला अनओळखी व्यक्तीच्या नावाने फिर्याद नोधून घेतीली. पण तो व्यक्ती कोण असं प्रशन? चिन्न पोलिसा समोर होत. तो तपास पोलीस पथकला सोपवून तपासाचे चक्र गतिमान करून अथक प्रयत्नाने चोराच्या मुसक्या आवळल्या. आतातर चोरी होणे, जीवे मारणे, मारमारी करणे, वार करणे, असे नाना तरचे गुन्हे होत आहेत. पण शहरावर नजर ठेऊन असलेल्या तिसरा डोळा म्हणजे सि. सि. टीव्ही. च्या आधारे बदमासी करणाऱ्याला पोलिसांकडून पकडणे सुलभ होते. असे माणण्यात येते तरी पण गुने होणे कमी होत नाही. सीसीटीव्ही कॅमेरे नसताना सुद्धा चोरीचा लावला छडा.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार अंबरनाथमध्ये काही दिवस अगोदर अंबरनाथ पूर्व शिवागंगा परिसरात घरफोडी झाली होती. पोलीस तपास करीतच होते. तेवढ्यातच आठवड्या पूर्वी जावसई परिसरात मंदिरात चोरी झाली. गुने प्रकटिकारण पोलीस पथकणे तपासाची चक्र गतिमान करीत. घरघोडी टोळकी सक्रिय आहे का, सगळी कडे तपास करणे सुरु केले. अस्यातच पोलिसांच्या हाती नवीन सुगवा लागला. अंबरनाथ मधील भगत सिंग नगर परिसरात नवीन कोणी तरी बाहेरून आलेत. अशी गुप्त माहिती मिळाली गुप्त माहितीच्या आधारे दोगांना संशहीत म्हणून ताब्यात घेतले. त्यांना विचारणा केली असता पहिले उडवा उडावीचे उत्तरे देत होत. पण पोलिसं हिसक्का दाखवताच पोपटा सारखे बोलू लागले. करवरसिंग टाक व त्याचा मित्र पुणेतील हडपसर परिसरात राहणारे आहेत. करवरसिंग हा अट्टल चोर असून त्याच्यावर चोरीचे तब्बल एकोणतीस घुणे त्याच्या नावावर नोद आहे. त्यांनी उल्हासनगर मधील दोन मोटर सायकल चोरल्या, शिवगंगा मध्ये घर फोडीची कबुली दिली. जावसई परिसरातील मंदिरा मध्ये चोरी मीच केली अशी कबुली दिली. मी माझ्या लग्ना साठी लागणाऱ्या खर्चासाठी रक्कम गोळा करीत आहे. असे सुद्धा पोलिसांना संगितले. कारवार्सिंग कडुन एकंदरीत दोन लाख बहात्तर हजार मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. घरफोडी साठी लागणारे साहित्य काटोनी, स्क्रूड्रायवर, चाकू इत्यादी साहित्य पोलीस ताब्यात घेण्यात आले. तो पुण्यावरून आपल्या मामाच्या घरी अंबरनाथ येते आला होता. करवरसिंग सोबत असलेला कर वरसिंगचा मित्र तो अल्पवाहिनी असल्यामुळे त्याला बालसुधारगृहामध्ये पाठवण्यात आले. पुढील तपास अंबरनाथ शहर पोलीस स्टेशन अंतर्गत चालू आहे.

# लायन्स क्लब वसई भरारीचा महिला दिन संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तुषार पब्लिकेशन व लायन्स क्लब वसई भरारी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२२ रोजी गणपतराव वर्तक सभागृह वसई येथे अनोखा महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे ला. प्रीती सोडा व ला. मीना रामास्वामी उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत एकूण ५१ दिव्यांग महिलांना साडी व साखर वाटप करण्यात आली. या कार्यक्रमासाठी लायन्स क्लब वसई भरारीच्या अध्यक्षा भारती पवार, रोहिणी पाटील (सचिव), सोनिया ठक्कर (खजिनदार) तसेच लायन्स क्लब वसई भरारीच्या सदस्या उपस्थित होत्या. तसेच लायन्स क्लबचे पदाधिकारी दीपक बडगुजर व हनुमंत भोसले उपस्थित होते. सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब वसई भरारीच्या श्रद्धा मोरे यांनी अथक परिश्रम घेतले.

# येल्लोरीवाडी येथील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार भूमिपूजन सोहळा संपन्न

**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील येल्लोरीवाडी (कोळेवाडी) येथील जागृत हनुमान मंदिराचा भूमिपूजन व जिर्णोद्धारांचा कार्यक्रम पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. येल्लोरीवाडी येथील ब्रह्मचारी शामराव पाटील यांच्या श्रद्धेने पावन झालेल्या या भूमीत हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. या प्रसंगी प्रसिद्ध पुरोहित पुरुषोत्तम जोशी यांनी विधीवत मंत्रोच्चार करून हा भूमिपूजन सोहळा सुरू केला. सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे येथील वारकरी बांधवांनी टाळ मृदंगाच्या निनादात भव्य मिरवणूक काढून प्रारंभी स्वागत केले. येल्लोरी वाडी येथील ग्रामस्थांनी त्यांच्या सढळ हाताने जमा केलेल्या लोकवर्गणीतून हा मंदिराचा जीर्णोद्धार साकारणार असून प्रसिद्ध शिल्पकार अंतेश्वर केंद्रे हे शिखर सुशोभिकरणाचे काम व शिल्प साकारणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून येल्लोरी सोसायटीचे चेअरमन दिलीप पाटील, सरपंच दशरथ सर्जे नाथ संस्थांचे सद्भक्त शाम कुलकर्णी मुक्तेश्वर पडसाळगे, पत्रकार राम कांबळे, विलास तपासे, विठ्ठल पांचाळ कुलकर्णी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपल्या आशिर्वचनातून बोलताना सद्गुरू गहिनीनाथ महाराज म्हणाले कि संकट मोचन हनुमान म्हणजे सर्व भाविक भक्तांचे शक्तिस्थान असून हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार आपल्या सर्वांच्या सहकार्याने व पुढाकाराने होत असून ही वास्तू दर्जेदार व्हावी यासाठी आपण स्वतः बांधकाम सुरू असताना लक्ष घालणार आहोत. असेही सद्गुरू घेण्यात महाराज यांनी यावेळी म्हटले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य अभियंता हिराकांत सर्जे, महादेव सर्जे, गुरुनाथ सर्जे, सुधीर सर्जे, नारायण सर्जे विजय कुमार सर्जे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



## थोडक्यात वृत्तांत



### मोस्ट वॉन्टेड गुन्हेगारांचे छायाचित्र जारी

विरार : विरार शहरात एकानंतर एक गोळीबाराच्या दुर्दैवी घटना घडल्यानंतर मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय सक्रिय झाले आहे. पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी सर्व पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. विरार पोलिसांनी नुकतेच मोस्ट वॉन्टेड अशा दोन सराईत मरेकऱ्यांची छायाचित्रे प्रसारित करून त्यांची माहिती देणाऱ्यास उचित इनाम जाहीर केले आहे. सोबत दिलेल्या चित्रातील व्यक्ती सराईत गुन्हेगार असून कुणाला जर ते दिसले किंवा कुणालाही त्यांच्याबद्दल काही माहिती असल्यास खलील ईमेल किंवा मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांना मो.नं. ८६६९६०४०२० तथा पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिलीप राख यांना मो.नं. ९८२३०५३०५३ यावर संपर्क साधावा. अथवा pi.virar.mb-vv.mahpolice.gov.in या ईमेल वर कळवावे असे विरार पोलिसांनी प्रसारित केलेल्या पत्रकात म्हटले आहे.



### शिवसेनेच्या उपविभाग प्रमुख पदी प्रदीप पवार

भिवंडीः शहरातील अजयनगर येथील शिवसेनेच्या मध्यवती कार्यालयात सुभाषनगर इथं राहणारे प्रदीप पवार यांची शिवसेनेच्या उपविभाग प्रमुख पदी निवड करण्यात आली असून शिवसेना शहर प्रमुख सुभाष माने यांच्या हस्ते एका कार्यक्रमात नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी माजी आमदार रुपेश म्हात्रे आणि महापालिकेचे स्थायी समिती सभापती संजय म्हात्रे यांनी प्रदीप पवार यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. यावेळी महानगर प्रमुख श्याम पाटील, सचिव महेंद्र कुंभारे, उपशहर प्रमुख राम शिगवण, राजू गोलांडे,नवनाथ लगड,जितेंद्र पाटील, कैलास वाल्हेकर, संतोष नागपुरे, भूषण पांचाळ, अमोल लगड, हरी गोलांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते दरम्यान प्रदीप पवार यांनी शिवसेनेच्या स्टाईल मध्येच नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणार असून मला जबाबदारी दिलेल्या क्षेत्रात कोणावरही अन्याय होऊ देणार नसल्याचे अश्वासन दिले आहे.

# जळकोट शहराचा पाणी पुरवठा नियमित

## राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते शुभारंभ



**लातूर/करकरे अंबादास**

लातूर आज जळकोट तालुक्यातील कोळनुर या गावात जळकोट शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एक्सप्रेस फिडरचा शुभारंभ पर्यावरण, पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जळकोट नगरपंचायतीचे नगराध्यक्ष श्रीमती प्रभावती कांबळे, उपनगराध्यक्ष मन्मथ अप्पा किडे, अर्जुन आगलावे, जिल्हा बँकेचे संचालक मारुती पांडे, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री दराडे गावचे सरपंच रमेश चोले, बालाजी ताकबिडे, बाबुराव जाधव इत्यादी उपस्थित होते. जळकोट शहराचा पाणी पुरवठा नियमित करण्याच्या बाबतचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित होता येथे पिण्याच्या पाण्याचा नैसर्गिक स्रोत नसल्याने या शहरास खूप संघर्ष करावा लागत होता. उन्हाळ्यात पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत होती. अशा दुष्काळ परिस्थितीमुळे नागरिकांचा व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होता. शहराला पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या तलावातून पाणी पुरवठा शहरात घेऊन येण्यासाठी अंखडीत वीजपुरवठा करण्याची आवश्यकता होती यासाठी एक एक्स्प्रेस फिडर बसविण्याची मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत होती शहरवासीयांनी पाण्याचा प्रश्न सोडविण्याची ही मागणी राज्यमंत्री बनसोडे यांच्याकडे केली होती, त्यांच्या या फिडरची गरज ओळखून काही दिवसांपूर्वीच ५० लाख रुपये एक्सप्रेस फिडर साठी मंजुरी देण्यात आली होती. त्याचे काम तत्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले. अवघ्या काही दिवसात काम पूर्णत्वास नेऊन त्याचा आज शुभारंभ करण्यात आला. यावेळी जळकोट शहरातील नगरपंचायत नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवक उपस्थित होते. याद्वारे जळकोट शहराला पाणी पुरवठासाठी २४ तास वीज उपलब्ध करून देण्यात येणार असून यामुळे येथील पाण्याची प्रश्न सुटेल व शहरातील पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी मदत होणार असल्याचे राज्याचे पर्यावरण पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

# जिजाऊ संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त भव्य हळदी-कुंकू समारंभ संपन्न




**वाडा/प्रतिनिधी**

संस्थांतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने वाड्यातील पां. जा.महाविद्यालयाच्या प्रांगणात महिलांसाठी भव्य हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान वाड्याच्या मातीत जन्म घेऊन, शिक्षण घेऊन मानाच्या उच्च पदावर कार्यरत असलेल्या महिलांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान गरजू महिलांना शिलाई मशीन वाटपकरण्यात आले तर दहा महिलांना पैठणी साडीची भेट देऊन सत्कार करण्यात आला. आरोग्य यंत्रणा, कायदा व सुव्यवस्था समर्थपणे सांभाळणाऱ्या वाडा शहरातील आशा, परिचारिका, डॉक्टर, पोलिस व स्वयंरोजगार करणाऱ्या महिला तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांना या कार्यक्रमात भाग घेला होता. वाडा शहरातील शेकडो महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली व कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला. महिलांनी सुद्धा जागतिक दिवस मोठ्या आनंदात व उत्साहात खेळीमेळीच्या वातावरणात साजरा केला. या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष, निलेश सांबरे, उप विभागीय जी.एस.टी. विभागाच्या स्मिता म्हात्रे - गांधी,अॅड. तपस्या म्हात्रे, डॉ, तेजश्री पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे त्यांच्या मातोश्री भावनादेवी व भगवाना सांबरे, जिजाऊ संस्था महिला सक्षमीकरण प्रमुख पालघर जिल्हा हेमांगी पाटील, जिजाऊ संस्था ठाणे जिल्हा प्रमुख मोनिका पानवे व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होते.

**घराचे शेअर सर्टिफिकेट गहाळ**

मी **घनश्याम विष्णू पाटील**, वय वर्षे ५७, रा. ए/३०२, रिद्धीश्री सोसायटी, फुलपाडा रोड, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर माझ्या राहत्या घरातून तीन महिन्यांपूर्वी घराचे शेअर सर्टिफिकेट गहाळ झाले आहे. याबाब विरार पोलीस ठाण्यात प्रॉपर्टी मिसिंग रजि.नं. ४०४/२०२२, दिनांक २४/०२/२०२२ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सही/-
**घनश्याम विष्णू पाटील**

क्राईम Reporter
9890718873

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

# वसईत 'भरोसा सेल'चे पोलिस आयुक्त डॉ.सदानंद दाते यांच्या हस्ते उद्घाटन!



**वसई/प्रतिनिधी**

महिला, बालक व ज्येष्ठ नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारची मदत व सुविधा मिळावी, या उद्देशाने १ ऑक्टोबर २०२१ रोजी भाईंदर येथे भरोसा सेलची स्थापना करण्यात आली होती. पण वसईतील दोन व तीन परिमंडळातील नागरिकांना या सेलशी संपर्क करणे लांब पल्ल्यामुळे कठीण होत होते. यामुळे ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त डॉ. सदानंद दाते यांनी परिमंडळ दोन व तीनसाठी पोलिस उपायुक्त संजयकुमार पाटील यांच्या कार्यालयातच भरोसा सेलची स्थापना करुन त्याचे उद्घाटन सोमवारी केले. यावेळी अप्पर पोलीस आयुक्त एस.जयकुमार, गुन्हे पोलिस उपायुक्त डॉ.महेश पाटील, पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील, सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महिला दक्षता कमिटी व एनजीओच्या अनेक महिलावर्ग, डॉक्टर, वकील यावेळी उपस्थित होते. वसईतील या भरोसा सेलची जबाबदारी महिला सहायक पोलिस निरीक्षक अर्चना कोळी यांच्याकडे देण्यात आली आहे तर भाईंदर येथील भरोसा सेलची जबाबदारी असणाऱ्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांनी महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांचे हक्क व अधिकार याच्या माहिती दिली व पुस्तकाचे प्रकाशनही या कार्यक्रमात अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असून महिलांच्या सर्वाधिक तक्रारी या कौटुंबिक हिंसाचाराच्या असतात. महिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर गुन्हे दाखल होतात, परंतु त्यामुळे न्याय मिळेलच याची शाश्वती नसते. पुढे लढा कसा द्यायचा, असा प्रश्न उभा राहातो. या काळात पीडित महिला मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून जाते. त्यामुळे अशा महिलांना मदत करण्यासाठी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या संकल्पनेतून भरोसा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांविषयक गुन्हे कौटुंबिक असतील तर समुदपेशन केले जाणार आहे. जी प्रकरणे सामोपचाराने सोडविणे शक्य असतील ती सोडविण्यात येतील. पीडित महिलेच्या पाठीशी भक्कम आधार (बॅकअप) उभा करणे हा यामागे उद्देष असल्याचे पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांनी सांगितले. ...पान ६ वर

# जागतिक महिला दिनानिमित्त आदिवासी महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयात साकारली वारली चित्रकला

**आदिवासी परंपरा, संस्कृती जोपासण्यामध्ये महिलांचा मोठा सहभाग - डॉ.गुरसळ**




**पालघर/प्रतिनिधी**

आदिवासी समाजामध्ये महिलांचे स्थान आदराचे असून समाजातील विविध समस्या, दैनंदिन जिवनात होणाऱ्या व्यवहारामध्ये महिलांचा सहभाग असतो. वारली चित्र लिपिची जनक महिलाच असून आदिवासी समाजात परंपरा, संस्कृती ठिकविण्याचे मोलाचे कार्य महिलाच करत असल्याचा विश्वास जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी व्यक्त केला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन, जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा माहिती अधिकारी राहुल भालेराव, तहसीलदार स्वाती घोंगडे, आदिवासी श्रमिक महिला मंडळ, आदिवासी महिला एकता परीषदेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जागतिक महिला दिनानिमित्त आदिवासी महिलांनी भिंतीवर वारली चित्रकला स्विकारली. या चित्रकलेचे अनावरण जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी रिबिन कापून केले. या वारली चित्रामध्ये आदिवासी समाजातील जन्म संस्कार, विवाह संस्कार, मृत्यू संस्कार, पारंपारिक पंच व्यवस्था ...पान ६ वर

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना नावालाच!

**कृषी कार्यालयचा पाठपुरावा कमी पडत असल्याचा लाभार्थ्यांचा आरोप**

**देवणी/शकिल मनियार**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना हि नावालाच आहे का असा प्रश्न तालुक्यातील मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसदारास पडला असून याची काटेकोरपणे अमंलबजावणी होत नसल्याचे चित्र सध्या देवणी तालुक्यात पाहयवयास मिळत आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी कि अपघातामुळे मृत्यू ओढवल्यास किंवा अपंगत्व आल्यास गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमायोजनेअंतर्गत शासनातर्फे अर्थसहाय्य देण्यात येते. शेतकऱ्याला अपघात झाल्यास कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशावेळी अपघातग्रस्त शेतकऱ्यास किंवा त्याच्या कुटुंबास योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्यात येते. या अर्थसाह्य मिळण्या करिता तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे संपूर्ण कागदपत्राची पुर्तता करून दाखल करावे लागते संबंधित कृषी कार्यालय हे युनिव्हर्सल




सोम्पो जनरल इंशुरन्स कं.लि विभागीय कार्यालय पुणे यांच्या कडे सदर विम्यासाठी लागणारी कागदपत्रे पाठवुन मयत शेतकऱ्यांच्या वारसास अर्थसाह्य मिळण्यासाठी पाठपुरावा केल्यानंतर अर्थसाह्य मिळते, परंतु देवणी तालुक्यातील मौजे देवणी (खु.) येथील अल्पभुधारक शेतकरी राम सोपान सुर्यवंशी यांचे दिनांक १ मार्च २०२१ रोजी पाण्यात बुडुन मृत्यू झाले आहे. संबंधित शेतकऱ्याची पत्नी रेखा राम सुर्यवंशी हिने घरातील कर्ता पुरुष गेल्याने गोपीनाथ मुंडे आपघात विमा योजनेतील शासनाकडून दिले जाणारे अर्थसाहय मिळण्याकरीता देवणी तालुका कृषी कार्यालयाकडे सर्व कागदपत्राची पुर्तता करून हि जवळपास अंदाजे एक वर्षापासून अद्याप ...पान ६ वर

# शिक्षकांनी उभारली गावकऱ्यांच्या सहकार्याने प्रयोगशाळा

**निलंगा/प्रतिनिधी**

तालुक्यातील दगडवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांच्यातील प्रयोगशीलता वाढावी यासाठी स्वतः योगदान देत पालकांचे सहकार्य घेऊन शाळेसाठी प्रयोगशाळेची उभारणी केली. यासाठी जवळपास २० हजार रुपये खर्च आला. या प्रयोगशाळेचे उद्घाटन तहसीलदार व मान्यवर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शनात यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. या कार्यक्रमास तहसीलदार गणेश जाधव, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते आणि दगडवाडी गावचे सुपुत्र डॉ.हंसराज भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनात पहिला, दुसरा आणि




तिसरा क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना तहसीलदार गणेश जाधव यांनी विज्ञान विषयावरील प्रश्न विचारून मुलांना शिक्षणाचे महत्व सांगितले. शिक्षणामुळे माणसाला समाजात हवे ते स्थान प्राप्त करता येऊ शकते. त्यासाठी शालेय जीवनात चांगले शिक्षक मिळणे फार महत्वाचे आहे. आम्हला शालेय जीवनात चांगले शिक्षक भेटल्यामुळे आम्ही जिल्हा परिषद शाळेत शिकून अधिकारी होऊ शकल्याचे मत व्यक्त केले. गटविकास अधिकारी अमोल ताकभाते यांनी विज्ञान प्रयोग सादर केलेले विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. जि.प. शाळेतील विद्यार्थी जगाच्या स्पर्धेत उतरवण्याची क्षमता शिक्षकात असते मात्र त्यांनी आपले काम प्रामाणिकपणे केले पाहिजे, असे ते म्हणाले. डॉ. हंसराज भोसले यांनी आपल्या गावातील शाळेला डायस भेट दिला. जिल्हा परिषद शाळा दगडवाडी गावातून नवोदयमध्ये पहिल्या येणाऱ्या मुलासाठी कायम स्वरूपी पुरस्कार सुरु करावा. त्याचे स्वरूप ठरवावे. त्याची पूर्तता करण्याचे आश्वासन देवून त्याचबरोबर शाळेच्या ग्रंथालयाला जी काही पुस्तके लागतील ती देण्याचे आश्वासन दिले. या प्रयोगशाळा उभारणीसाठी विज्ञान शिक्षक विजयकुमार सोमवंशी यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक तहसीलदार गणेश जाधव यांनी केले यातून दुसऱ्या शिक्षकांनी प्रेरणा घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक वाकडे, प्रास्ताविक विजयकुमार सोमवंशी यांनी केले. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत दगडवाडी-तुपडीचे सरपंच परमेश्वर गोरे, उपसरपंच संतोष भोसले, शालेय व्यवस्थापन समितीचे बलभीम भोसले, सुरेश भोसले माधव, भोसले साहेबराव भोसले, ग्रामसेवक पाटील यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

# महापालिका आणि नगरपालिका रुग्णालयांमध्ये शववाहिका बंधनकारक -आरोग्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी**

महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये शववाहिका ठेवणे बंधनकारक असून ज्या महापालिका-नगरपालिकांमध्ये शववाहिका नसेल त्यांनी जिल्हा नियोजन समितीमधून किंवा आमदार निधीमधून शववाहिनी घेण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे, असे सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी विधानसभेत सांगितले.






पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यतील पायरवाडी येथे आरोग्य सोयी-सुविधांच्या अभावाबाबत सदस्य अमित साटम यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले की, रुग्णवाहिकेतून मृतदेह वाहून नेण्याचे प्रावधान नाही. मृतदेह वाहतुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शववाहिका उपलब्ध असतात. ज्या महानगरपालिका आणि नगरपालिकांकडे शववाहिका उपलब्ध नसतील त्यांनी त्या घ्याव्यात यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. जिल्हा नियोजन समितीमधून किंवा आमदार निधीमधून ही शववाहिका घेता येणार असल्याचेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. पालघर येथे पायरवाडी येथील सहावर्षीय मुलाच्या मृत्यूनंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली मात्र रुग्णवाहिका चालक उपलब्ध नव्हता. जे.एस.एस.के. अंतर्गत कंत्राटी शकॉम मेडिया इंडिया प्रा. लि. भोपाळ या संस्थेमार्फत हे वाहनचालक पुरविण्यात आले असून तीन वाहनचालकांना काढून टाकण्यात आले आहे. आरोग्य उपसंचालकांच्या मार्फत या प्रकरणाची तपासणी केली जाणार असल्याचेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. महिलांच्या प्रसूतीसाठी १०२ या विशेष क्रमांकावर रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या असून अलिकडच्या काळात राज्यात सुमारे एक हजार रुग्णवाहिका बदलल्या आहेत. मोखाडा ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन रुग्णवाहिका देण्यात आल्या असून ग्रामीण रुग्णालय मोखाडासह उपजिल्हा रुग्णालय जव्हार आणि चार प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात येत असल्याचेही आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.



जागतिक महिला दिना निमित्त पालघर जिल्हा संपर्क संघटक भारती गावकर व महिला जिल्हा संघटक किरण चेंदवणकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली वसई तालुक्याच्या तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी पदभार सांभाळणाऱ्या महिला तहसीलदार उज्वला भगत ह्यांचा सत्कार शिवसेना वसई शहर महिला आघाडीच्या वतीने करण्यात आला. वसई विधानसभा समन्वयक नयना ताई वर्तक ह्यांचा हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ह्यावेळी महिला विभाग संघटक संगीता भोईर, अक्साना शेख, शाखा संघटक वंदना नायगावकर, कल्पना नाडकर्णी आदी पदाधिकारी व महिला शिवसैनिक उपस्थित होते.

# शासकीय योजना घरा-घरात पोहचणार; लोककला पथकाला नागरिकांचा प्रतिसाद

**पालघर/प्रतिनिधी**

राज्य शासन लोकाभिमुख योजना राबवत आहे. या योजना लोककला पथकांच्या माध्यमातून घरा - घरात पोहचणार असल्याचे चित्र लोककला पथकांना मिळणाऱ्या नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादातून दिसून येत आहे. राज्यातील महाविकास आघाडी शासनाला दोन वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय मार्फत तीन कला पथकांची निवड करून जिल्ह्यामध्ये शासकीय लोककलांच्या माध्यमातून योजनेचा प्रसार व प्रचार करण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये



जनजागृती कलामंच यांनी डहाणू तालुक्यातील डहाणू गाव, डहाणू, बोर्डी, आशागड, वाणगाव तर सिद्धिविनायक संस्था यांनी वाडा तालुक्यातील पाली आणि विक्रमगड तालुक्यातील आलोंडे, वसुरी तसेच माय नाटक कंपनी या संस्थेने वसई तालुक्यातील विरार येथील मासळी बाजार, वसई मधील भाजी मार्केट, गोखिवरे येथील कपडा बाजारांमध्ये पथनाट्याद्वारे शासकीय योजना उपक्रम यांची प्रसिद्धी केली. या पथनाट्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहेत.

# वेग आणि अचुकता ही यशाची गुरुकिल्ली -सपोनि प्रदिप गिते

**जव्हार/प्रतिनिधी**

वेग आणि अचुकता यांचा सुरेख मेळ घालून जो स्पर्धत उतरतो तोच जिकतो, म्हणून वेग आणि अचुकता हिच यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतीपादन पोलीस निरीक्षक गिते यांनी उटावली येथील युपीकेएल क्रिकेट स्पर्धच्या उद्घाटन प्रसंगी केले. ते पुढे म्हणाले की ग्रामीण भागातील मुलांमध्ये उपजत अनेक सुप्त कलागुण असतात त्या कलागुणांना संधी अशा स्पर्धामधुन मिळते व त्यातुनच कविता राउत सारखे अनेक खेळाडू देशाला मिळाले असल्याने अशा विवीध खेळाच्या स्पर्धा भरवणे गरजेच्या झाल्या आहेत असे बोलून स्पर्धा आयोजकांच अभिनंदन केलं. या स्पर्धा उटाकली, पोटखळ, कावळा या तिन्ही गावचे



तरुण खेळाडू व युवकांच्या पुढाकाराने भरण्यात आल्या होत्या. स्पर्धा यशश्वी करण्यासाठी शिवराम मुकणे, कृष्णा गावीत, अजय गावित यांनी प्रयत्न केले. उदघाटन प्रसंगी तंटामुक्ती अध्यक्ष रमेश रडे, संदीप भोये, आनंद दुकाटे, पोलीस पाटील दिलीप गावीत, पोलीस हवा. सावत, पोलीस नाईक गाटे, बाळाराम वळवी, कृष्णा गरे, राजेंद्र महाकाळ तसेच परीसरातील मान्यवर उपस्थीत होते. या सामन्या मधे खतरनाक ईलेव्हन या संघाने प्रथम तर सुर्या ईलेव्हन या संघाने दुसरा तर क्रिश इलेव्हन संघाने तिसरा क्रमांक पटकावला. परिसरातील लहान मोठ्या तरुणानी स्पर्धचा आनंद घेतला.

**स्वराज्य राज्यव्यापी कामगार संघटना**



नोंदणी क्रमांक - काउआ/ठाणे/१९८०/२०२२ स्थापना : २०२२

संस्थापक अध्यक्ष

**श्री. प्रशांत आर. धोंडे**

संपर्क : ७३५०३१६४८७

कार्यालयीन पत्ता : शॉप नं. ५१८, टेंभी, कोल्हापूर, आगाशी, बाजार पेठ, विरार (प.),ता. वसई, जि. पालघर

संपर्क कार्यालय : महात्मा फुले नगर, चक्रेश्वर अपार्टमेंट समोर, सोपारा रोड, नालासोपारा (प.), ता.वसई, जि. पालघर, Email - prashantdhonde14@gmail.com

# कुडूस येथे भाजपचा विजयोत्सव; पेढे वाटून, फटाके फोडून केला जल्लोष

**वाडा/प्रतिनिधी**

देशातील पाच राज्यांत झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने चार राज्यांत घवघवीत यश संपादन केले . त्यामुळे गुरुवारी (दि.१० मार्च) तालुक्यातील कुडूस येथे कार्यकर्त्यांनी एकत्र येत विजयी जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडत एकमेकांना लाडू, पेढे वाटून आनंद व्यक्त केला. 'नरेंद्र मोदी आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' अशा घोषणांनी कुडूस नाका दणाणून सोडला. उत्तरप्रदेश, गोवा, मणिपुर, उत्तराखंड व पंजाब या देशातील प्रमुख पाच राज्यांतील निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. या पाच राज्यांपैकी चार राज्यांत भारतीय जनता पार्टीने मोठे यश संपादन करून विविध पक्षांचा सुपडा साफ केला आहे.



भाजप या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरला असून चार राज्यांत घवघवीत यश संपादन केले आहे. याप्रसंगी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, महीला आघाडी जिल्हा सरचिटणीस मेघना पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अर्चना भोईर, महीला आघाडी तालुकाध्यक्षा अंकिता दुबेले, माजी महिला बालकल्याण सभापती धनश्री चौधरी, वासुदेव पाटील, माजी तालुकाध्यक्ष केशव पाटील, डॉ. वसंत हिरवे, भालचंद्र कासार, धनंजय चौधरी, सतीश भोईर, भरत जाधव, उत्तम चौधरी, महेश पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.